**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2260/2007.**

श्री ॲड. एस. ओ. रउफ
रा. मोहनपूरा, मलकापूर
ता. मलकापूर जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद कार्यालय बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.2.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर असून त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले नाही. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.12.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

झेड.ए.उर्दु हायस्कुल मलकापूर मधील प्रलंबीत प्रशासकीय मान्यतेसाठी अप्रुव्हल मंजुरत देण्याचे कायरवाईबाबतची तपशिलवार माहिती.

1 जानेवारी 2006 ते ता. 30.11.06 कालावधी झेड.ए.उर्दु हायस्कुल मलकापूरचे प्रशासकीय अधिकारी हेडमास्तर यांना त्याने 1 जानेवारी 2006 ते ता. 30.11.06 पावेतो कालावधीमध्ये सदर प्रशासनाने सदर हायस्कुलचे कायम शिक्षक पदावर मंजुरात देणे (अप्रुव्हल सादर करणे) व सदर शाळेच्या संबंधित इतर कोणकोणत्या कामासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बुलढाणा व इतर उच्च अधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी पाठविलेले प्रकरणाची सविस्तर नावावर तपशिलाची माहिती मिळावी.

1. शकील पटेल जमिल पटेल

2. हेहानाबानो गुलाम सौफी

कोणत्या बेसवर वरील लोकांनी हेडमास्तरांनी अप्रुव्हल घेतला याची सविस्तर माहिती व त्यांचे शैक्षणिक पात्रता काय आहे याची माहिती मिळावी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. केलेले दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 6.1.2007 रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी आपणास हवी असलेली माहिती कोणती याचा बोध होत नाही तसे स्पष्टपणे या कार्यालयास कळवावे त्यानुसार आपणास माहिती पुरविण्यात येईल. यातील बरीचशी माहिती शाळा स्तरावरील असल्यामुळे मुख्याध्यापक यांचेकडे सुध्दा उपलब्ध होवू शकेल. सदरच्या पत्राची प्रतिलिपी मुख्याध्यापक यांना माहिती करीता रवाना. आपणास सुचित करण्यात येते की आपल्या स्तरावरील उपलब्ध असलेली माहिती संबंधितास पुरविण्यात यावी. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल न करता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सदरची माहिती अपीलकर्ता यांना मुख्याध्यापक झेड.ए.उर्दु हायस्कुल मलकापूर यांनी दि. 15.12.2007 रोजी उपलब्ध करुन दिलेली असून त्याबद्यल मिळाल्याची पोच ही अपीलकर्ता यांनी मुख्याध्यापक यांना दिलेली आहे. त्याबाबतची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांचेकडे मात्र त्यांनी

कोणत्याही प्रकारचा मागितलेल्या माहितीप्रमाणे खुलासा केलना नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 1.12.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1131–1133

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2261/2007.**

श्री मुरतुजा अली मन्सुर अली सैफी
न्यु सैफीकार्डवेअर, इतवारा चौक,
वर्धा 442001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. एस. चिलमुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप आयुक्त (सा.प्र.विभाग)
नगर पालिका प्रशासन, नागपूर
2) श्री शशी मोहन
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारीयांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.1.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

ता. 17.7.2005 ते 14.9.2005 तक वर्धा न.प. द्वारा बी पी एल लिस्ट मे नाम समाविष्ट करणेबाबत सवेक्षण किया गया एर्व सर्वेक्षण के मुताबिक रु. 591/75 प्रति माह कमाने वाले के नाम बी पी एल लिस्ट मे नाम समाविष्ट होणेबाबत लिस्ट मंजुरी के लिऐ मुंबई भेजी गई बी पी एल कि लिस्ट के संदर्भ मे निचे लिखी माहिती मिलने बाबत.

ता. 17.7.2005 ते 14.9.2005 तक वर्धा शहर मे रु. 591/75 प्रति माह कमाने वाले कितने लोगोके नाम बी पी एल मे समाविष्ट किये गये उनके नाम पते सहित माहिती.

2. ता. 17.7.2005 ते 14.9.2005 और इसके बाद प्रति माह रु. 591/75 से जादा कमाने वाले कितने लोगोके नाम बी पी एल मे समाविष्ट किये गये उनके नाम पते सहित माहिती.

3. ता. 7.6.05 से न.प. वर्धा द्वारा बीपीएल यादी की जो लिस्ट मंजुरी के लिये भेजी गई उस संदर्भ मे 1. लिस्ट मंजुरी के लिये किस अधिकारी को भेजी गई उसका नाम पद पता फोन नं. मो.नं.सहीत माहिती 2. लिस्ट मंजुरी के लिये न.प.को जो पद भेजा गया उस वर्ष की प्रत 3. जितने नाम बीपीएल अेपीएल मे डाले गये उनके नाम पते सहित की सी डी. 4. उपरोक्त लिस्ट आज तक मंजुर क्यू नही कि गई उस संदर्भ मे संपूर्ण माहिती 5. लिस्ट कितने दिनोमे मंजुर की जाऐगी उस संदर्भ मे संपूर्ण माहिती.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.2.2007 रोजी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या बद्यल मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या मुद्येनिहाय उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 7.3.2007 रोजी

प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक संचालक नगर पालिका प्रशासन यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.4.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थीस प्रतिवादी यांनी त्यांचे कार्यालय पत्र दि. 7.8.2007 अन्वये कळविलेले असल्यामुळे अपील अर्ज खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयानेसुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे कारण दिलेले आहेत. परंतु जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी सदरच्या द्वितीय अपील लिस्टला नगर परिषदेनी मान्यता देण्याचा अधिकार नसुन मान्यता देण्याचा अधिकार आयुक्त नगर पालिका प्रशासन यांना असल्यामुळे व आयुक्त नगर पालिका प्रशासन यांचेकडून मान्य होवून सदरची यादी प्राप्त झाल्याशिवाय उपलब्ध करुन देता येणे शक्य नव्हते व तसे त्यांना कळविलेले आहे. मात्र आता सदरच्या यादीस मान्यता मिळून प्राप्त झाली आहे व अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांना दि. 27.11.2008 रोजी पत्राने कळविण्यात आलेले आहे. सदरहू बीपीएल च्या एकुण 238 पानांची यादी याला येणा–या खर्चासह शुल्क भरुन सुवर्ण जयंती शहरी रोजगार विभाग न.प. वर्धा येथे येवून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले आहे. सदरची यादी ही हरकती मागविण्याकरीता कार्यालयात उपलब्ध आहे व त्याबद्यलची नोटिस ही वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या यादीच्या संदर्भामध्ये अवलोकन करण्याकरीता नगर परिषद कार्यालयामध्ये सर्वाच्या करीता उपलब्ध आहे. त्याप्रमाणे येवून त्याबाबत हरकती असल्यास दाखल करणे संयुक्तिक राहिल. किंवा अपीलकर्ता यांना सदरची यादी हवी असल्यास अपीलकर्ता यांनी दि. 17.11.08 रोजीच्या पत्राप्रमाणे कळविल्याप्रमाणे छायांकित प्रतीसाठी येणारा खर्च भरुन सदरची माहिती उपलब्ध करुन

देणे संयुक्तिक राहिल. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि.12.1.07 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.2.2007 रोजी वस्तुस्थिती विशद करणारी माहिती ही विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची यादीच्या प्रती हया अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 2.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1134–1137

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2264/2007.**

श्री फत्तुजी तात्याजी झोळ
अमोर किराणा स्टोअर्स जवळ, जैन मंदिर रोड,
दारव्हा जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ओमप्रकाश भा. निमकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सचिव/व्यवस्थापक
अग्लो व्हर्न्याक्युलर एज्युकेशन सोसायटी, दारव्हा जि. यवतमाळ
द्वारा अंबतका नगर, दारव्हा जि. यवतमाळ
2) श्री सुरेश भा. निमकर
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
कै. विरजी भिमजी धरेवरा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय
दारव्हा जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांची प्रकृति ठिक नसल्यामुळे ते येवू शकत नाही व कोणताही पत्रव्यवहार प्राप्त झाला नाही असे

आयोगाकडे त्यांनी लेखी पाठविलेले आहे. जन माहिती अधिकारी द्वारे संस्थेचे सचिव व त्यांचे वकील श्री डी.बी.निमकर हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.1.2007 रोजी तसेच 8.3.2007 रोजी श्री बी.एन.सरदार सहा. शिक्षक यांचेबद्यल सन 1999 च्या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक 8.3.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 21.3.2007 रोजी श्री सरदार यांनी दिनांक 25.6.98 रोजी स्वच्छानिवृत्तीचा अर्ज सादर केला होता परंतु त्यांनी सदरहु अर्ज तीन महिन्याचे आतच मागे घेतल्यामुळे संस्थेनी त्यांना पुर्ववत कामावर रुजु करुन घेतले. त्यांचे काढण्याबाबतीतील शाळा समिती व व्यवस्थापकीय समितीचा कोणत्याही प्रकारचा ठराव शाळेच्या रेकॉर्डला नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 8.6.2007 रोजी संस्थेचे सचिव श्री ओमप्रकाश भाउरावजी निमकर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये व्यवस्थापक यांनी मुख्याध्यापक श्री जवळकर यांना दि. 20.10.2007 रोजी झाळ यांनी दि. 17.3.2007 व 8.3.2007 च्या पत्रानुसार मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी व विलंब करु नये तसेच शाळेच्या रेकॉर्डला माहिती नसल्यास त्यांच्या पत्रावरुन माहिती जा.क्र. नुसार असल्याचे दिसून येते तेव्हा झोळ यांचेकडून माहिती घेवून त्यांना प्रमाणित करुन द्यावी. सदर पत्रानुसार तत्काळ खुलासा करावा असे कळविण्यात आले असे दिसून येते त्यप्रमाणे दि. 17.7.2007 रोजी श्री झोळ यांनी मुख्याध्यापक यांना पत्राद्वारे माहिती कळविलेली दिसून येते. परंतु सदरच्या निर्णया प्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 20.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकार्ता यांनी राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार झालेला नाही असे कळवून आयोगाची दिशाभूल केल्याचे दिसून येते कारण त्यांच्या

प्रथम अपीलामध्ये दि. 26.3.2007 रोजी शाळेच्या कर्मचा–यामार्फत प्राप्त झाले असे नमुद केलेले दिसून येते. त्याचप्रमाणे दि. 26.6.2007 रोजी त्यांनी स्वतःच वर नमुद केल्याप्रमाणे मुख्याध्यापक यांना पत्रव्यवहार केलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता हे स्वतः प्रामाणिक आहेत असे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी तसेच व्यवस्थापक यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

श्री झोळ यांना माहिती अधिकारात मु.अ.श्री ना.म.जवळकर यांनी माहिती दिली होती परंतु ती माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे असे श्री झोळ यांनी पत्राद्वारे कळविले तेव्हा पुन्हा श्री जवळकर मु.अ. यंना माहिती देण्यासंबंधी सांगीतले व त्यानुसार त्यांनी श्री झोळ यांना कर्यालयात बोलावून यापेक्षा वेगळी माहिती उपलब्ध नसल्याचे कळविले. व त्याच्याकडे असलेली माहिती प्रमाणित करुन देण्यासंबंधी सूचना मी श्री जवळकर यांना केलया व त्यानूसार त्यांनीसूध्दा पत्रव्यवहार केला परंतु अर्जदार श्री झोळ यांनी ते मान्य केले नाही. श्री झोळ यांना ज्या कामासाठी माहिती पाहिजे होती ती कोर्ट केस सुध्दा निकाली लागली असून त्यांचे न्यायालयीन प्रकरण समाप्त होवून मी व मुख्याध्यापक जवळकर यांनी त्यांना पेंशन संबंधी संपूर्ण लाभ मिळवून दिले आहे व त्यांची पेंशन केस सुध्दा मंजूर करवून दिली आहे. त्यामुळे आज त्यांना सदर माहितीची आवश्यकता नाही असे वाटते. सबब आपल्या स्तरावरुन योगय निर्णय दयावा ही विनंती.

श्री फ.ना.झोळ (निवृत्त मुख्याध्यापक) यांनी दि. 17.1.2007 रोजी पत्राद्वारे श्री बी. एन. सरदार यांचे संदीर्भात 1998–99 सालची माहिती मागितली होती. ती जुनी माहिती शोधण्याचा पूर्ण प्रयत्न केला. परंतु सरदार संदर्भात त्यांना पाहिजे असलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नव्हती. त्यानंतर मा. श्री झोळ यांना निरोप देवून कार्यालयात बोलाविले कारण 1992 ते 1996 या काळात ते स्वतः मुख्याधपक होते. ती माहिती कोणत्या दप्तरात किंवा कोणत्या आलमारीत आहे असे विचरले तेव्हा तुम्ही आरामात शोधा असे ते म्हणाले परंतु शोधुनही ते सापडले नाही. श्री झोळ यांचे व शाळेचे चांगले

संबंध असल्यामुळे त्यांना सहकार्य करण्याच्या दृष्टिकोतनातून रेकॉर्ड शोधण्याचा प्रयत्न केला त्यात विनाकरण वेळ वाया गेला. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. अखेर दि. 21.3.2007 रोजी श्री झोळ यांना पत्राने तसे कळविले व नुसतेच पत्र पाठवून आम्ही थांबलो नाही त्यांची मुळ समस्या सोडविण्यासाठी मा. अध्यक्ष, व्यवस्थापक व मी स्वतः कामाला लागलो. त्यांना पेंशन मिळावी त्यांचे सर्व खोळंबलेले आर्थिक देयके निकालात निघावी म्हणून काम केले व आज रोजी त्यांना सर्व आर्थिक लाभ प्राप्त झालेले आहेत व पेशन मिळत आहे. ज्या कारणासाठी त्यांना माहिती हवी होती ती सर्व कामे पूर्ण झाली आहेत त्यांचा कोणताच प्रश्न शिल्लक राहिलेला नाही फक्त आम्ही आपणास लेखी कळवू शकलो नाही. वरील दोन्ही खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती एकतर त्यांच्या संबंधित नाही तसेच स्वतः अपीलकर्ता मुख्याध्यापक असतांनाच्या कालावधीतील आहे. श्री झोळ यांचे पेंशन च्या संदर्भामध्ये प्रकरणे प्रलंबित असल्यामुळेच त्यांनी अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. यावरुन त्यांनी कोणत्याही व्यापक जनहिताकरीता मागितलेली नाही तर स्वहिताकरीता त्यांचे प्रलंबित प्रकरण मार्गी लावून घेण्याचे दृष्टीने मागितलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी तसेच संस्थेचे सचिव प्रथम अपीलीय अधिकारी व त्यांचे वकील यांनी असे सांगितले की आतापर्यंत श्री झोळ यांचे संदर्भातील सर्व देणी झालेली असल्यामुळे त्यांचे वैयक्तिक कोणतेही प्रकरण संस्थेकडे प्रलंबित नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.3.2007 व 8.3.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला असल्यामुळे व माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 2.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1139—1142

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे्त्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2266 / 2007.**

श्री कैलास तुळशिराम उपर्वट

मु. पो. दऊळगाव

ता. पातुर जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एम. मोसरे प्रथम अपीलीय अधिकारी तथा

गट विकास अधिकारी

पंचायत समिती पातुर जि. अकोला

2) श्री आर. एन. फलारी

जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक

ग्रामपंचायत दऊळगाव

ता. पातुर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.4.2007 रोजी माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत दऊळगाव यांचेकडे 1. यशवंत ग्रामसमृध्दी योंजने अंतर्गत लोक वर्गणी किती जमा झाली? 2. सद्या बॅंकेच्या खात्यात किती रक्कम जमा आहे? 3. ग्रामपंचायतने कोणत्या कामासाठी रक्कम दिली 4. सदर रकमेसाठी ठराव केव्हा घेतला होता 5. यशवंत ग्रामसमृध्दी यांजनेचे काम केव्हा सुरु झाले.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.5.2007 रोजी गट विकास अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 28.5.2007 रोजी सचिव ग्रामपंचायत यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत हे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. परंतु तत्कालीन सचिव ग्रामपंचायत हे सेवानिवृत्त झालेले आहेत असे गट विकास अधिकारी यांनी सांगितले. विद्यमान माहिती अधिकारी यांचेकडे कागदपत्रे नव्हती त्यामुळे माहिती देता आली नाही. मात्र आयोगाकडून नोटिस आल्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 18.11.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व तशी त्यांनी पोच दिलेली आहे असे सचिव ग्रामपंचायत यांनी दाखल केलेल्या पत्रावरुन दिसून येते. माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 2.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1143–1145

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2280/2007.**

श्री मोतीराम किसन कपले
मु. पो. चौभारा चौक जळगाव जामोद
ता. जळगाव जामोद जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री भगवान कांबळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार जळगाव जामोद
जि. बुलढाणा
2) श्री एस. यु. राऊत
जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसिलदार
तहसिल कार्यालय जळगाव जामोद
जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.3.2007 रोजी (20.3.2007 रोजी) जिल्हाधिकारी श्री पोरेड्डीवार यांचेकडे दि. 27.6.2006 व 4.9.2006 च्या लोकशाही दिन माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती अधिकरी निवासी नायब तहसिलदार जळगाव जा. यांनी अर्जदारास माहिती देण्याबाबत. विभागीय आयुक्त अमरावती च्या पत्राचा संदर्भ जिल्हाधिकारी बुलडाणा दि. 9.1.2007 च्या पत्राचा संदर्भ जिल्हाधिकारी बुलडाणा यांचे पत्र दि. 18.10.2006 च्या पत्राचा संदर्भ व अर्जदाराचे दि. 15.11.2006 चे माहिती अधिकारी निवासी नायब तहसिलदार जळगाव जा. यांना लिहीलेले पत्राचा संदर्भ दिलेला दिसून येतो. दि. 9.1.2007 चे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त झाले नाहीत. तहसिलदार जळगाव जा. व माहिती अधिकरी निवासी नायब तहसिलदार जळगाव जा. यांना आयुक्तांचे आदेश त्वरीत कळविण्यात यावे व वर नमुद केलेल्या दि. 27.6.2006 व 4.9.2006 च्या लोकशाही दिनाच्या सर्व मुद्यासह खरी माहिती मला माहिती अधिकारी निवासी नायब तहसिलदार जळगाव जा. यांना त्वरीत देण्याचे आदेश देण्यात यावे. त्या माहितीच्या प्रती 1. मा. नारायणराव राणे साहेब, महसुल मंत्री, महा. राज्य मुंबई 2. मा. राजेंद्रजी शिंगणे साहेब, महसुल राज्यमंत्री तथा पालकमंत्री महा. राज्य मुंबई 3. मा. सुधिरकुमार गोयल साहेब महसुल आयुक्त अमरावती यांना देण्यात याव्यात अशा प्रकारचा अर्ज दिलेला दिसून येतो. अर्जाच्या प्रतिलिपी पुन्हा वरील सर्वांना दिलेल्या दिसून येतात. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.3.2007 रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी माहिती अधिकारी तहसिल कार्यालय यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल अर्जाचे हस्तांतरण केलेले दिसून येते. व सदरच्या अर्जाची प्रतिलिपी ही अपीलकर्ता यांना दिलेली आहे ती त्यांना दि. 4.4.2007 रोजी प्राप्त झाली अशी नोंद आहे. परंतु दिनांक 11.4.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी तहसिल कार्यालय जळगाव जा. यांनी आपण सादर केलेले अर्ज हे रा. प्र. क. एम.आर.सी.81/खेलखासा बु./4/2005–2006 या प्रकरणाशी संबंधित आहे प्रकरणात अंतिम निकाल लागलेला नाही. सदहू

अर्ज प्रकरणा बरोबर ठेवण्यात आले आहे हे हया अगोदर सुध्दा या कार्यालयामार्फत कळविण्यात आलेले आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 23.4.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.5.2007 रोजी देण्यात आलेला असून मागितलेल्या माहितीतील प्रकरण हे तहसिलदार यांचे कोर्टात अद्याप न्यायप्रविष्ट आहे तसेच अपीलकाराने दि. 27.6.2006 व 4.9.2006 ला सादर केलेले अर्ज हे माहितीचा अधिकार 2005 अधिनियमच्या तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे अपीलार्थी यांचा अर्ज नस्ती करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्या सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांचे रा. प्र. क्र. एम.आर.सी. 81/खेलखासा बु./4/2005 –2006 हे प्रलंबित असल्यामुळे त्यातील निर्णयाची माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. व सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे असे त्यांनी कळविलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी योग्य तो निर्णय दिलेला आहे. असे असले तरी सदरच्या प्रकरणामध्ये संपूर्ण माहिती अपीलकर्ता यांना मिळालेली आहे असे त्यांचे म्हणणे असल्यामुळे प्रकरण हे खारीजकरण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 4.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1146–1149

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2279/2007.**

श्री अशोक विठठलराव देशमुख
नविन मधुसुदन कॉलनी खडकी बु.
पो. गांधीनगर आकोला ता. जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी अकोला
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.4.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून तहसिलदार अकोला कार्यालयात 1) प्रवास भत्ता देयक बाबत दि. 28.3.2007 ला दिलेल्या अर्जावार झालेली कार्यवाही बाबत माहिती.

2) माहे आगष्ट 2004, सप्टेंबर 04, ऑक्टोबर 04 दिलेल्या प्रवास भत्ता देयकाची झेरॉक्स प्रत द्याव्या.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2007 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 15.6.2007 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परतु त्या निर्णयामुळे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दि. 28.3.2007 रोजी दिलेला अर्ज व दाखल केलेले देयक ही त्या कार्यालयात स्विकारलेली आहे याबद्यलचा पुरावा दाखल केलेला आहे व त्यामुळे दि. 15.5.2007 रोजीच्या पत्रामध्ये संबंधित लिपीक प्रवास भत्ता देयक बाबत माहिती दिली नाही असे जे म्हटले आहे त्याबाबत संबंधित लिपीकाची चौकशी करण्यात येवून प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक राहिल. तसेच आवक नोंदवहीमध्ये ज्या लिपीकाने नोंद घेतलेली नसेल त्याबाबतचा पुरावा सादर केलेला आहे त्याची चौकशी करुन त्यांचे विरुध्द सुध्दा प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक ठरेल कारण माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता संबंधिताचे सहाय्य घेणे आवश्यक असते. व संबंधितानी जर माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर त्यांना सुध्दा कलम 5 (5) माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांचे विरुध्द कलम 20 प्रमाणे कारवाई करणे आवश्यक ठरते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दि. 23.4.2007 च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही संबंधित आवक लिपीक व संबंधित देयक लिपीक यांचे चौकशी करुन हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत अपीलकता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांचे देयक ज्यांनी स्विकारुन पुढील कार्यवाही केली नाही आहे त्यांचे विरुध्द चौकशी करुन प्रशासकीय कारवाई करण्यात यावी व तसा अहवाल आयोगाकडे 3 महिन्यात सादर करावा.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 4.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1150—1152

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 484/2008.**

श्री हरीभाऊ गणपतराव माटेटवार

30 टेलिफोन नगर, ओम आटा चक्की

नरसाळा नोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

पालीस उपआयुक्त (वाहतुक)

पश्चिम विभाग, नागपूर शहर

2) जन माहिती अधिकारी तथा

सहाय्यक पालीस आयुक्त (वाहतुक)

पश्चिम विभाग, नागपूर शहर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.3.2008 रोजी (12.3.2007 रोजी) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2007 रोजी पालीस उपआयुक्त मुख्यालय यांचे कार्यालयातील माहिती अधिकारी यांना हेड कॉन्स्टेबल श्री बबलु कनोजिया ब.क्र.3297

तक्रार दाखल उध्दट शब्दानी बोलुन दोन चापट मारण्याची धमकी देण्याबाबत केलेली पुढील कार्यवाहीची माहिती मिळण्याबाबत.

माहितीचा विषय दोन साक्षदाराची 1. श्री शामराव महादेवरावजी बान्ते 2. श्री उमाकांत फकीरजी भोयर या तारखेची साक्षदाराची सत्य बयानाची प्रत मिळाली. व आर.सी.बुक मध्ये रु. 200/– ची (अक्षरी रु. दोनशे) होते त्याची माहती मिळण्याबाबत तसेच कायदयातील तरतुदीनुसार (मोटर व्हिकल ॲक्टनुसार) ऑटोरिक्षाचे चालन बनविण्याचा अधिकार कोण कोणत्या अधिका–यांना आहे व तो नियम कोणत्या वर्षाला पारीत करण्यात आला त्या नियमांचे शासन परिपत्रक मिळण्याबाबत.

सदरची माहिती नोंदणीकृत सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.12.2007 रोजी अपीलकर्ता यांना सहाय्यक पालीस आयुक्त (वाहतुक) यांनी मागितलेल्या माहितीचे उत्तर दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 7.1.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये चुकीची माहिती पुरविली हे. कॉ. व नायक यांना अधिकार दिले असल्यास शासन परिपत्रकाची फोटो कॉपी मिळण्याबाबत पोलीस उपनिरीक्षक व सहा. पोलीस उपनिरीक्षक यांना वाहनाचे कागदपत्र तपासणे/ताब्यात घेणे तसेच तडजोड शुल्क स्विकारण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे. परंतु आर.सी.बुक मध्ये रु. 200/– ची (अक्षरी रु. दोनशे) होते त्याची माहती मिळालेली नाही व मोटर व्हिकल ॲक्ट केव्हा परीत झाले शासनाचे परिपत्रकाची फोटोकॉपी देखील मिळालेली नाही. ती मिळण्याबाबत अर्ज पुनश्च सादर. व माहितीचे वर्णनामध्ये अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या मताप्रमाणे कारवाई केली नाही याबाबतची तक्रार दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 16.1.2008 रोजी अपीलकर्ता यांच्या अपील मेमोमध्ये त्रुटी असल्यामुळे त्याबाबत त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. पुन्हा दिनांक 20.2.2008 रोजी अपील मेमोमध्ये त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती

अधिकारी यांनी त्यांचे 1.12.2007 चे पत्रानुसार आपली तक्रार फाईल करण्यात आलेली आहे असे लिहिलेले आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलामध्ये सुध्दा प्रथम अपीलाबरोबरच कारणे दिलेली दिसून येतात व गुन्हा दाखल केल्याची कारवाईची अपेक्षा दिसून येते.

3. वास्तविक अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 10.11.2007 च्या अर्जाप्रमाणे दिनांक 1.12.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे. मोटर व्हिकल ॲक्ट केव्हा परीत केला असे त्यांनी प्रथम अपीलात विचारले आहे. परंतु कोणताही अधिनियम पारीत केल्यानंतर त्याची तारीख ही अधिनियमातच दिलेली असते व ज्याअर्थी अपीलकर्ता यांना मोटर व्हेईकल ॲक्ट माहिती आहे व त्याचे पुस्तकसुध्दा त्यांचेजवळ आहे त्याअर्थी त्याची तारीखसुध्दा माहिती असणे क्रमप्राप्त आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे जी माहिती प्रसिध्द झालेली असते ती मागण्याची आवश्यकता नाही. तसेच अधिनियमच्या कलम 2 (च) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात जी माहिती साहित्याच्या स्वरुपात म्हणजे कागदपत्रे, अभिलेखे, टिपण्या इत्यादी स्वरुपात उपलब्ध असते त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा ''माहितीचा अधिकार'' आहे. कोणत्याही प्रकारे एखाद्या प्रकरणात कारवाई करुन मागणे हा ''माहितीचा अधिकार'' नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 10.11.2007 च्या अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य असल्यामुळे व दि. 20.2.2008 चा प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 4.12.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1153–1156

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2285/2007.**

श्री वाय. एस. देशभ्रतार
सुगत भवन, कुंभरे नगर, तुमसर 441912
पो. ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री नांदेडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक
नागपूर विभाग नागपूर
2) श्री एस. पी. पाठेकर
जन माहिती अधिकारी तथा
लेखाधिकारी
लेखा परिक्षण पथक, शिक्षण विभाग
भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.5.2007 रोजी (28.5.2007 रोजी) शासकीय माहिती अधिकारी लेखाधिकारी लेखा परिक्षण पथक, शिक्षण विभाग भंडारा यांचेकडे खालीलप्रमाणे 3 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. मागितलेली माहिती दि. 16.6.2007 रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 20.6.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 13.7.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. व सदरचे पत्र अपीलकर्ता यांनासुध्दा दिलेले दिसून येते. दि. 1.8.2007 च्या पत्राप्रमाणे लेखाधिकारी यांनी शिक्षण उपसंचालक यांना माहिती पुरविल्याचे कळविलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्याबद्यल प्रथम अपीलाचा निर्णय नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांना उपलब्ध झालेली आहे हे त्यांनी मान्य केलेले आहे. परंतु मागितलेल्या माहितीमध्ये अपुर्ण माहिती मिळाली असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच चुकीची माहिती मिळाली असेही त्यांचे म्हणणे आहे. अपुर्ण माहितीच्या संदर्भामध्ये ज्या ज्या शिक्षक, शिक्षिका यांची माहिती मागितलेली आहे अद्याप काही शिक्षक, शिक्षिका यांची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांचेकडे कायम स्वरुपी उपलब्ध नसते तर लेखा पडताळणी झाल्यानंतर त्या त्या नगर परिषदेकडे संबंधित नस्त्या परत पाठविल्या जातात व ती माहिती संबंधित न. प. च्या सामान्य प्रशासन विभागाकडे उपलब्ध होईल असे त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. त्यावरुनही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की माहिती त्यांचेकडेच उपलब्ध आहे ही बाब ज्याअर्थी काही माहिती लेखाधिकारी यांनी

दिली त्याअर्थी इतरही माहिती त्यांचेकडे उपलब्ध असली पाहिजे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही व त्याबाबत लेखाधिकारी यांनी पुन्हा त्यांचे कार्यालयात शोध घेवून अपीलकर्ता यांना ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांनी त्यांना ज्या शिक्षक, शिक्षिकेची माहिती मिळाली नाही त्यांची नावे जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी यांना दिल्यास माहिती उपलब्ध करुन देणे सुलभ होईल. माहिती चुकीची आहे याकरीता अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये चुकीचे निर्णय असल्यामुळे ती माहिती चुकीची आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) प्रमाणे ''माहिती'' या व्याख्येमध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेख, कागदपत्रे, टिपण्या, दस्तऐवज इत्यादीच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्यांच्या छायांकित प्रति उपलब्ध करुन देणे असा ''माहिती अधिकाराची'' व्याख्या आहे. व त्यामुळे निर्णय प्रक्रियेतील अनियमिततेच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही आयोगाकडून होवू शकणार नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यावरुन त्यांनी योग्य त्या सक्षम अधिका–याकडे तक्रार करणे हे अधिक योग्य होईल. मात्र वर नमुद केल्याप्रमाणे ज्या शिक्षकांची माहिती उपलब्ध झाली नाही ती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 25.5.2007 च्या अर्जातील मुद्या क्र. 1 मधील मागितलेली माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी शिक्षकांची नावे जन माहिती अधिकारी यांना हा

निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावी व त्यानंतर 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सदरची माहिती छायांकित प्रतिच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 5.12.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1157–1160

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2292/2007.**

श्री सुभाष किसनराव तेटवार
गाळा क्र. T-IV/2/4 उर्जानगर
चंद्रपूर 442404 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. बी. खराबे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य महाव्यवस्थापक
चंद्रपूर महा औष्णिक विज केंद्र (महाजनको)
उर्जाभवन, चंद्रपूर 442404

2) श्री बी. एम. दास
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
चंद्रपूर महा औष्णिक विज केंद्र (प्रशासन)
उर्जाभवन, चंद्रपूर 442404 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.6.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी म्हणून महानिर्मिती कं. मर्या. यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. श्री सुरेश रेवतकर यांचे शिफारस पत्र चौकशी अहवाल चे पत्रात रेवतकराची माहिती असंबध्द असल्यामुळे त्यांचे गुणवंत कामगार पुरस्काराबाबत चा दावा अपात्र ठरतो. अशा आशयाचे वसंत काळे का सचीव यांचे पत्रावर सीएसटीपीएस व्यवस्थापनानी केलेली कार्यवाही अहवाल. 1) आपल्या कार्यालयामार्फत केलेली कार्यवाही. 2) कार्यवाही केली नसल्यास का केली नाही? कशी करणार माहिती?

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 6.7.2007 रोजी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 24.7.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.8.2007 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना पुन्हा स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी पुन्हा दि. 13.8.2007 रोजी अपीलीय अधिकारी यांचेकडे एक साध्या पत्राने स्पष्टीकरण विचारलेले आहे. परंतु दि. 14.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्यात सत्य वास्तव माहिती न पुरविल्यामुळे असे द्वितीय अपील करण्याचे कारण दिलेले आहे. अपीलकर्ता यांच्या दि. 13.8.2007 च्या अर्जास दि. 11.9.2007 रोजी उत्तर दिलेले आहे. व सदरचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे नाही.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व उपलब्ध झालेली माहिती यांचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिलेली माहिती तसेच प्रथम अपीलात दिलेले स्पष्टीकरण व दि. 11.9.2007 रोजी दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 6.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1169–1171

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2296/2007.**

श्री संदीप वरु
एन एस बी रोड, भामटीपूरा वर्धा
जि. वर्धा 442001. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दुष्यंत सिडाम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सह निबंधक
सहकारी संस्था, नागपूर विभाग नागपूर
धनवटे चेंबर्स (अनेक्स) सिताबर्डी नागपूर
2) श्री एस. एम. स्वामी
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.8.2007 रोजी (31.8.2007 रोजी) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.1.2007 रोजी भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन समितीच्या माध्यमातून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय जिल्हा वर्धा यांना खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धाचे आर्थिक वर्ष 2000–2006 पर्यंतची माहिती कालावधी 200–2006 पर्यंत. आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेले कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धाचे आर्थिक वर्ष 2000–2001, 2001–2002, 2002–2003, 2003–2004, 2005–2006 पर्यंतचे ऑडिट रिपोर्ट तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धाचे 2000–2006 पर्यंतचे सविस्तर बॅलन्सशिटच्या प्रती प्रत्येक आर्थीक वर्षाप्रमाणे देण्यात यावी. माहितीच्या अधिकार अन्वये वर्ष 2000–2006 पर्यंतचे कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धाचे झालेले सभेचे (कार्यकारीणी सभा व आमसभा) संपुर्ण प्रोसिडींगची छायाप्रत उपलब्ध करुन देण्यात यावी. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये येणारे खर्च मी वहन करण्यास तयार आहे. माहिती विहित मुदतीत (30 दिवसात) स्पष्ट, अचुक, सविस्तरपणे उपलब्ध करुन देण्यात यावी. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.1.2007 रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांनी माहिती अधिकारी तथा सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा यांना अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश देवून सदरच्या अर्जाची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते. तसेच दि. 8.3.2007 रोजी जिल्हा उपनिबंधक यांनी पुन्हा माहिती अधिकारी तथा सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा यांना अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. व अपीलकर्ता यांना प्रत दिलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दि. 9.3.2007 रोजी अपीलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 5.5.2007 रोजी देण्यात आलेला असून सदरच्या निर्णयाने

समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस जिल्हा उपनिबंधक यांनी असे सांगितले की मागितलेली माहिती ही कृषी उत्पन्न बाजार समितीकडे असल्यामुळे त्यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता कृषी उत्पन्न बाजार समितीस आदेश दिलेले होते. त्याचप्रमाणे दि. 16.3.2007 रोजी सुध्दा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा यांनी कबुल केले असल्यामुळे अर्जदार यांनी सुध्दा सदर माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर दि. 17.3.2007 रोजी सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा यांनी अपीलकर्ता यांना माहितीच्या झेरॉक्स प्रतीचा खर्च रु. 464/- भरावा असे कळविलेले दिसून येते. दि. 20.3.2007 रोजी अपीलकर्ता यांनी माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे कलम 6 च्या पोटकलम 6 प्रमाणे रक्कम भरण्याचा प्रश्नच उदभवत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 21.3.2007 रोजी पुन्हा सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा यांनी सदर माहिती कोणत्या प्रयोजनाकरीता पाहिजे आहे व जनतेला त्याचा काय उपयोग होणार आहे हे स्पष्ट न केल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 विवेचन 1 (ड) अन्वये ती माहिती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. दिनांक 28.3.2007 रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांनी सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी लागते असे कळविलेले दिसून येते. व सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. दिनांक 3.4.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक यांचेकडे अपीलकर्ता यांनी झालेल्या पत्रव्यवहाराच्या संदर्भामध्ये आक्षेप घेणारे पत्र दाखल केले होते व त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय याचे अवलोकन केले असता चर्चेत अपीलार्थी

यांनी कार्यालयात माहिती उपलब्ध असूनही माहिती अधिका–यानी अपीलार्थी यांना कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा यांचेकडे संपर्क साधण्यास कळविले हे संयुक्तिक नाही. व त्यामुळे अपीलार्थी यांचे अपील हे मान्य करता येत असून अपीलार्थी क्र. 1 यांनी मागितलेली माहिती या आदेशापासून 15 दिवसात योग्य ते शुल्क आकारुन अपीलार्थी यांना उपलब्ध करुन द्यावी. दि. 19.5.2007 रोजी सचिव वर्धा कृषी उत्पन्न बाजार समिती यांनी खर्चाचा भरणा करावा असे पत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 19.5.2007 रोजी रु. 1417/– याचा भरणा केलेला दिसून येतो. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 29.5.2007 रोजी सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

4. वरील संपूर्ण प्रकरणामध्ये कोणत्याही अधिका–याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचे पालन केलेले नाही असे दिसून येते. अधिनियमच्या तरतुदीप्रमाणे कलम 6 (1) प्रमाणे अर्ज आल्यानंतर अधिनियमातील इतर तरतुदीप्रमाणे दिलेली असलेली प्रक्रिया पूर्ण करुन 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. परंतु कोणत्याही प्रकारची मुदत सदरच्या प्रकरणात पाळलेली दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही त्याकरीता कलम 6 च्या पोटकलम 6 प्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी लागते हे निदर्शनास आणुन सुध्दा पुन्हा पुन्हा अपीलार्थी यांनी योग्य ते शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी अशा प्रकारचे आदेश प्रथम अपीलात तसेच सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती वर्धा यांनीसुध्दा दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दि. 29.5.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे व त्यांचा अर्ज हा दि. 12.1.2007 रोजीचा असल्यामुळे निश्चितच ती विलंबाने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. माहितीच्या अर्जाचे अवलोकन केल्यास कोणती माहिती उपलब्ध आहे व कोणती माहिती उपलब्ध नाही व उपलब्ध असलेल्या माहितीच्या करीता किती खर्च येईल याबद्यलचे विवरण हे

सुरुवातीसच द्यावयाचे असते. जेणेकरुन संपुर्ण पक्रिया ही 30 दिवसात पुर्ण व्हावयास पाहिजे. परंतु तशी ती पुर्ण केली गेलेली नाही. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असाही निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक ठरते त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांचेकडून माहितीच्या खर्चाचे भरणा करुन घेतलेले रु. 1417 (रु. एक हजार चारशे सतरा फक्त) हे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना चेक द्वारे परत करण्यात यावे व चेक रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 6.12.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1172–1176

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2300/2007.**

श्रीमती विमला देवप्रियम मधुरा
प्लॉट नं. 18, गेहानी ले आउट,
श्राजनगर, काटोल रो, नागपूर 13. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर
2) श्री एन.एच.पाटील
जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क. 3 नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.8.2007 रोजी (31.8.2007 रोजी) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.5.2007 रोजी सिटी सर्व्हे कार्यालय नं.3 यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

Ref- My application to city survey office for mutation submitted on 7.5.2004-

Mutation of gifted house property (City survey no. Jaripatka 2435)

Information required – Why till date mutation of my gifted houlse property not done by city survey office. Although property gifted to me on 15.3.2000 is not under any dispute/litigation in the Court of law.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 25.5.2007 रोजी विषयांकित बाबतच्या संदर्भात या कार्यालयात आपण दि. 7.5.2004 ला नामांतरण करण्यासाठी अर्ज सादर केला होता. त्या अर्जाचा शोध घेतला असता दिसुन येत नसल्याचे आढळुन आले. तरी आता आपण नामांतरणासाठी कागदपत्राचे पुराव्यासह अर्ज सादर करावे/हजर राहावे. तुमच्या अर्जावर नियमानुसार विहित केलेल्या मुदतीत कार्यवाही करण्यात येईल. याद्वारे आपणास समज देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. नंतर दि. 16.6.2007 रोजी पुन्हा नगर भुमापन अधिकारी यांनी ''सदर प्रकरणातील कागदपत्राची मागणी केली असता ती पुरविण्याचे कबुल केले. तदनंतर 15.6.2007 रोजी हजर होवुन श्री सॅलुमल विलफ्रेड यांनी अर्जदाराकडून दिलेला देणगी दस्ताची छायाप्रत सादर केली. सादर दस्ताचे आधारे मौजा जरीपटका ख.क्र. 83/3 न.भु.क्र. 2835 च्या आखिव पत्रिकेचे अवलोकन केले असता नझुल प्लॉट नं. 18 पेज 250.84 ची मिळकत अभिलिखीत धारक यांनी श्री दिलीप जान्हॅसन सेलोमल विलफ्रेड यांचे नावे करुन दिलेली आहे. त्यामुळे श्री सोलॅमल यांच्या नावाची नोंद कमी झालेली आहे. आपल्या विक्रीपत्रान्वये विक्री करुन देणारे धारक त्यांचे नाव उपरोक्त फेरफाराने कमी झाले असल्याने आपल्या अर्जावर

नामांतरणाची कार्यवाही केलेली नाही. करता येत नाही. करीता आपला संदर्भिय माहिती अधिकारा खालील अर्ज याद्वारे निकाली ठेवण्यात येत आहे याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 13.8.2006 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.10.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थी यांचे प्रकरणी उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी केल्यावरुन असे दिसून येते की अपीलार्थी अर्जदार यांचे प्रकरणी नगर भूमापन अधिकारी क्र. 3 नागपूर हे जन माहिती अधिकारी असून त्यांनी पुरविलेल्या माहितीचे विरुध्द अधीक्षक भूमी अभिलेख नागपूर हे अपीलीय अधिकारी असल्याने त्यांचेकडे नियमानुसार अपील दाखल करावयास होती परंतु तसे न करता त्यांनी इकडील कार्यालयास अपील दाखल केले आहे तरी पण सदभावनेची कृती या सबबीखाली अपीलात सुनावणी घेत आहेत. अधीक्षक भूमी अभिलेख नागपूर यांना संबंधित अपीलात रितसर नियमानुसार हवी असलेली माहिती पुरवावी असे आदेश उपसंचालक भुमि अभिलेख यांनी दिलेले दिसून येतात. प्रथम अपीलाचा वरील निर्णय मिळण्यापुर्वीच अपीलकर्ता यांनी दि. 30.8.2008 रोजी द्वितीय अपील दाखल केले. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडील अपील हे प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द नाही.

3. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 4.5.2007 च्या अर्जामध्ये फेरफार नोंदीच्या संदर्भामध्ये प्रश्न विचारलेले आहेत. व त्यामुळे सदरचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे दस्तऐवज किंवा कागदपत्राच्या माध्यमातून माहिती मागण्याचा नसून सदरच्या प्रकरणामध्ये गुणवत्तेच्या बाबत निर्णय करण्याकरीता दिलेला दिसून येतो. परंतु राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत निर्णय करण्याचा अधिकार नाही तसेच कोणत्याही प्रकरणातील कारणमिमांसा विचारणेही अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरच्या प्रकरणी महा. जमिन महसुल संहिता 1966 च्या तरतुदीप्रमाणेच न्याय मिळवुन घेणे संयुक्तिक राहिल. व त्याप्रमाणे त्यांनी

योग्य त्या सक्षम अधिका–याकडे तक्रार अर्ज दाखल करुन सदरचे प्रकरण अपीलात प्रलंबित आहे असे अपीलकर्ता यांनी सुध्दा सांगितले व जन माहिती अधिकारी यांनीसुध्दा सांगितले. व त्याप्रमाणे दि. 29.9.2007 रोजी स्वतंत्र अपीलामध्ये पारीत केलेला आदेश माहितीकरीता दाखल केलेला आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती प्रमाणे अन्यत्र निर्णय झालेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये दि. 7.5.2004 ला नामांतरण करण्यासाठी अर्ज सादर केला होता व तो दिसून येत नसल्याचे आढळुन आले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की सदरचे अर्जाची आखीव नोंदवहीमध्ये नोंद आहे व त्यामुळे सदरच्या अर्जाप्रमाणे कार्यवाही पण झाली नाही व सापडत नसेल तर त्याबाबत संबंधित नगर भूमापन अधिकारी यांनी चौकशी करुन जबाबदार अधिकारी किंवा कर्मचारी विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल जेणेकरुन यापुढे आलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये प्रक्रिया करण्याची जबाबदारी निश्चित होईल. मात्र अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांचा दि. 7.5.2004 च्या नामांतरणाचा अर्ज कार्यालयात आवक नोंदवहीत नोंद झाली असल्याने त्याबाबतची चौकशी करुन संबंधित कर्मचा–यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 6.12.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1177–1181

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2297/2007.**

श्री भिमराव राजन्ना जमपंलवार
रा. केरझर ग्रा. पं. डोंगरगाव
पो. विरुर (स्टे) ता. राजूरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. व्ही. रामाराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वनपरीक्षेत्राधिकारी/वनसंरक्षण समिती
नवेगाव पो. विरुर (स्टे) ता. राजूरा जि. चंद्रपूर
2) श्री डी. एम. उके
जन माहिती अधिकारी तथा
वनपरीक्षेत्राधिकारी
चंद्रपूर मध्य वन विभाग चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.8.2007 रोजी अध्यक्ष वनसंरक्षण समिती नवेगाव यांचेकडे बैलबंडी पकडल्याबाबत. माझी स्वतःची बैलबंडी कुपना करीता दि. 21.4.2007 जंगलातून आणण्यात आले. ते पकडून सुनिल जपंलवारला बंडीवर होता. ते पकडण्यात आले. ती गाडी कोठे आहे. व बैल कोठे कोण्या ठिकाणी जोडण्यात आले. अजूनपर्यंत पत्ता नाही व तुम्ही माहिती दिली नाही. त्या बैलबंडीची जबाबदार अध्यक्ष/सचिव राहील. बैलबंडीची कोतवाल रशिद, बॅंकेचे खाते बुक, वनसंस्थेचे रेकॉर्ड याचे झेरॉक्स कॉपी अर्जदारास माहिती द्या.

अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.8.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी बैलबंडी व बैल हे पकडलेले असून कोठे आहे असे अर्जात विचारलेले आहे व तसे त्यांनी तोंडीपण आयोगास सांगितले. त्याबद्यलचा बैलबंडीची कोतवाला रशिद, बॅंकेचे खाते बुक, वनसंस्थेचे रेकॉर्ड त्याकरीता त्यांनी मागितले असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु वनसंरक्षण समितीचे अध्यक्ष हजर आहेत. त्यांनी असे सांगितले की सदरचा अर्ज त्यांचेकडे आला होता परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती द्यावी किंवा नाही यांची मला माहिती नाही. तसेच अपीलकर्ता यांच्या मुलाला त्यांच्या वनसंरक्षण समितीच्या परीसरात लाकुड चोरतांना गुन्हा करतांना पकडण्यात आले होते व त्यामुळे वनसंरक्षण समितीच्या समोर त्यांना रु. 300 चा दंड करुन बैलबंडी त्यांना परत करण्यात आली आहे त्याबाबत त्यांनी पंचनामा केलेला आहे. व तसे त्यांचा मुलगा अनील यांनी लेखी लिहुन दिलेले आहे असे असतांना बैलबंडीची कोतवाल रशिद असण्याचे कारण नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती द्यावयाची असते याची मला माहिती नसल्याने व ही सर्व प्रक्रिया वनसंरक्षण समिती यांचे पुढे झालेली आहे. कोतवाल

बुकाचे पुस्तक किंवा वनसंरक्षण समितीचे रेकॉर्ड अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता वाटली नाही कारण ते आमच्या वनसंरक्षण समितीच्या कक्षेबाहेर आहे. कोंडवाडा कोतवाल रशीद वर नमुद केल्याप्रमाणे नाही व त्यामुळे माहिती देण्याचा प्रश्नच उदभवला नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडे प्रथम अपील दाखल झालेले नाही असे नमुद केलेले असले तरी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल करण्याच्या करीता रीसीट दाखल केलेली आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की सदरचे अपील त्यांचे कार्यालयात दाखल झालेले आढळुन आलेले नाही व त्याकरीता त्यांनी खालीलप्रमाणे खुलासासुध्दा आयोगाचे कार्यालयात दाखल केलेला आहे.

आपले कडील संदर्भित पत्रानुसार भिमराव राजन्ना जंमलवार रा. केरझर ग्रा. पं. डोंगरगाव पो. विरुर (स्टे) ता. राजूरा यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले अपील क. 2297/2007 वनपरिक्षेत्र अधिकारी चंद्रपूर यांचेकडे प्राप्त झाले. सदरचे प्रकरण वनपरिक्षेत्र विरुर यांचेशी संबंधित असल्याने त्यांनी विषयांकित अपील अर्ज वनपरिक्षेत्र विरुर यांचेकडे दि. 19.11.08 रोजी सोपवला. वनपरिक्षेत्र अधिकारी विरुर यांनी प्रथम अपीलीय अधिकारी उपवनसंरक्षक मध्य चांदा वनविभाग चंद्रपूर हे असल्याने अपील अपील क. 2297/2007 राज्य माहिती आयोगाकडे दाखल झाल्याची बाब निदर्शनास आणून दिली. कार्यालयीन दस्तऐवजाची तपासणी केली असता प्रथम अपील दि. 6.8.07 प्रथम अपीलीय अधिकारी उपवनसंरक्षक मध्य चांदा वनविभाग चंद्रपूर यांचेकडे प्राप्त झाली नसल्याचे आढळले.

द्वितीय अर्जासोबत जोडलेल्या माहितीचे अधिकार अर्ज दि. 17.6.07 चे अवलोकन करता अर्जदार भिमराव राजन्ना जंमलवार यांनी माहिती मिळणेबाबतचा अर्ज अध्यक्ष वनसंरक्षण समिती यांना उदेशून लिहिल्याचे दिसून आले. तेव्हा त्वरीत वनपरिक्षेत्र अधिकारी विरुर यांना अध्यक्ष वनसंरक्षण समिती यांना यांचेशी संपर्क साधण्याच्या सूचना

देण्यात आल्या. वनसंरक्षण समितीचे अध्यक्ष हे गावातील अशासकीय व्यक्ती असतात. वनपरिक्षेत्र अधिकारी विरुर यांनी वनसंरक्षण समितीचे अध्यक्ष नवेगाव यांची दिनांक 20.11.08 रोजी प्रत्यक्ष भेट घेवून माहितीचे अधिकाराअंतर्गत प्राप्त दि. 17.6.07 चे मुळ अर्जाबाबत चौकशी केली. अध्यक्षांनी अर्ज प्राप्त झाल्याचे सांगितले. तेव्हा त्यांना अर्जानुसार मागणी केलेल्या व्यक्तिस माहिती दयावयाची असते याबाबत जाणीव करुन दिली. तेव्हा त्यांनी सांगितले की माहितीचे अधिकाराखाली माहिती लेखी स्वरुपात दयावीच लागते ही बाब मला माहिती नव्हती. त्यांनी बैल व बंडी दि. 21.4.07 रोजी त्यांचे मुलाना नामे श्री सुनिल भिमराव जंपलवार व श्री अनिल भिमराव जंपलवार यांना पंचासक्ष दिल्याचे सांगितले व त्याबाबतची नोंद समितीकडील वनगुन्हा नोंदवहीमध्ये घेतल्याबाबत वपअ विरुर यांचे निदर्शनास आणून दिली. दि. 22.9.07 रोजीचे वनसंरक्षण समितीचे बैठकीस हजर होते त्यात बैल व बंडी त्यांचे मुलाकडे दि. 21.4.07 रोजी दिल्याची माहिती अध्यक्षांनी अर्जदारास तोंडी सांगितले. वनसंरक्षण समितीचे अध्यक्षांनी माहितीचा अर्ज दि. 17.6.07 त्यांचेकडे प्राप्त झाल्याची माहिती कोणत्याही वनाधिका—याला सांगीतली नाही. त्यामुळे वेळीच अर्जावर कार्यवाही करणे वनपरिक्षेत्र अधिकारी विरुर यांना शक्य झाली नाही.

वनसंरक्षण समितीचे बॅक खातेबूकाची झेरॉक्स व समितीचा दस्तऐवज लेखी स्वरुपात दयावी लागते ही बाब अध्यक्षांना माहिती नसल्याने वनपरिक्षेत्र अधिकारी विरुर यांनी अर्जदारास माहिती देण्यास सांगीतल्यानंतर अध्यक्षांनी सदरची माहिती पत्र दिनांक 22.11.08 अन्वये प्रत्यक्ष अर्जदार श्री भिमराव जंमलवार यांचेकडे जावून दिली. परंतू अर्जदाराने माहिती घेण्यास नकार दिला. ही बाब अध्यक्ष वनपरिक्षेत्र अधिकारी विरुर यांना सांगितली. तेव्हा वपअ विरुर यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अर्जदारास पाठविणेबाबत अध्यक्षांना सुचविले. त्याअनुषंगाने अध्यक्षांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती अर्जदारास रजिस्टर्ड पोस्टाने दि. 26.11.08 रोजी पाठविली.

तथापी अर्जदाराने पोस्टमनकडून माहिती स्विकृत न करता माहितीचा लिफाफा घेण्यास नकार दिला त्यामुळे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेल्या माहितीचा लिफाफा दि.2.12.08 रोजी अध्यक्षांकडे पोस्टाकडून परत आला.

श्री भिमराव जंमलवार यांनी यापूर्वी अपील अपील क्र. 2297/2007 राज्य माहिती आयोगाकडे दाखल केली होती व वनपरिक्षेत्र अधिकारी विरुर यांचेकडून माहिती मागितली होती. त्यामध्ये राज्य माहिती आयोगाने त्यांचा अर्ज खारीज केला आहे.

भविष्यात अशाप्रकारची पुनरावृत्ती होवून वनसंरक्षण समित्याकडे प्राप्त होणारे अर्ज प्रलंबित राहू नयेत व अर्जदारांना वेळीच माहिती उपलब्ध व्हावी या दृष्टीने वनसंरक्षण समितीकडील प्राप्त होणारे अर्ज संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे पाठविणेबाबत वनसंरक्षण समित्यांना पत्राद्वारे लेखी कळविण्या तसेच समित्यांचे बैठकित माहितीचा अधिकार अधिनियम 2005 बाबत वेळोवेळी मार्गदर्शन करणेस वनपरिक्षेत्र अधिकारी यांना या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष 1 (2)/लले/माअ/1846 दि.4.12.08 अन्वये सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

वरील खुलाशावरुन व अध्यक्ष वनसंरक्षण समिती यांचे बयाणाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना बैलबंडी परत मिळाली असे विचारले असता त्यांनी बैलबंडी परत मिळाली असे कबुल केले मात्र ते म्हणतात माहिती मिळाली नाही. बैलबंडी परत केली आहे तरी कोंडवाडा कोतवाल रशिद ही कशी मिळेल असे अध्यक्ष वनसंरक्षण समिती यांनी सांगितले व त्यावरुन मागितलेली माहिती प्रत्यक्षात उपलब्धच नाही असे दिसून येते. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांच्या मुलाची जंगल कटाई लाकूड चोरी पकडण्यात आलेली असल्यामुळे त्रास देण्याच्या उद्येशाने माहिती मागितलेली दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

6

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे जी माहिती प्रत्यक्षात उपलब्धच नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 6.12.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord3 53.–58

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2304/2007.**

श्री अनंतकुमार टेटे
सामाजिक न्याय मंच, गोवर्धन नगर,
तुमसर ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता व प्रशासक
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, वैनगंगा नगर
अजनी नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.4.2007 रोजी (कार्यालयात प्राप्त 21.4.2007 रोजी) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

वर्ष 2006–07 मध्ये आंधळगाव मिटेवानी शाखेत बेटेकर, बोथली, बछेडा, सोरणा, कवलेवाडा व इतर तलावांचे ए.आर. व फ्लड डेमेज अंतर्गत किती कामाचे करारनामे करण्यात आले. व सदर कामावर किती खर्च करण्यात आला. याची संपूर्ण माहिती देणे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.4.2007 रोजी अपीलकर्ता यांनी उपरोक्त संदर्भिय अर्जानुसार आपण मागितलेल्या माहितीकरीता रु.4 फक्त हया विभागात जमा करावे असे कळविलेले दिसून येते. व माहिती प्रत मिळाली अशी अपीलकर्ता यांची पोच दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 15.5.2007 रोजी माहिती न पुरविण्याबद्यल अधिक्षक अभियंता यांचेकडे दि. 15.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 24.5.2007 रोजी कंत्राटदार श्री रामू ढोके हे माझ्याकडे आपले कार्यालयीन पत्र माझ्या नावाचे दि. 30.4. 2007 चे दि. 22.5.2007 ला घेवून आले. सोबत मी केलेल्या अर्जाची झेरॉक्स प्रत सुध्दा त्यांच्याकडे होती. श्री ढोके यांनी आपल्या कार्यालयीन पत्रावर दि.30.4.2007 च्या तारखेत पत्र मिळाले, माहिती मिळाली व माझे समाधान झाले असे लिहवून घेण्याचा प्रयत्न केला. माझ्या अर्जाची झेरॉक्स प्रत व आपले कार्यालयीन पत्र श्री ढोके यांचेकडे कसे गेले याची चौकशी करुन दोषी कर्मचा–यावर कार्यालयीन गोपनियता भंग केल्याबद्यल कारवाई करण्यात यावी असे कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, भंडारा यांना लेखी दिले असून प्रतिलिपी अधिक्षक अभियंता यांना दिलेली दिसून येते. दि. 15.6.2007 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला असून 3 दिवसाच्या आंत प्राधिकरण कार्यालयास खुलासा करावा. तसेच अर्जदाराने मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना येत्या 3 दिवसाच्या आत समाधानकारक रित्या प्राप्त होवून अर्ज निकाली निघेल

असे पहावे व झालेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठवावा अन्यथा पुढील कार्यवाही करण्यात येईल असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानुसार कार्यकारी अभियंता यांनी अपीलकर्ता यांस असे कळविले की दि. 30.4.2007 द्वारा कळविले होते की माहितीपोटी आपण रु. 4.00 चा भरणा विभागीय कार्यालयात करावा व माहिती घेवून जावे सदरची माहिती आपणास त्वरीत मिळावी म्हणुन ते पत्र शाखा अभियंता मार्फत आपणास पोहचवुन देण्याकरीता कळविले होते. परंतु त्या पत्राचे कार्यालयीन प्रतीवर आपण माहिती व प्रत मिळाल्याचे लिहुन दिले आहे. तरीपण आपणास माहिती हवी असल्यास वर नमुद केलेली रक्कम विनाविलंब भरुन त्या पत्रात मागितलेली माहिती घेवून जावे असे कळविलेले दिसून येते. किंवा दि. 28.6.2008 रोजी अपीलकर्ता यांनी अधिक्षक अभियंता दि. 30.4.2007 चे पत्राचे संदर्भामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे झालेली घटना कळविलेली दिसून येते. त्यावर अधिक्षक अभियंता यांनी अहवाल मागविलेला होता तो आयोगाचे निदर्शनास आणला. व अपीलकर्ता यांनी जो आरोप केलेला आहे तो योग्य नाही असे अहवालात नमुद केले आहे व त्यामुळे अंतिमतः अपीलकर्ता यांनी दि. 30.4. 2007 रोजी माहिती पोटी रु. 4.00 चा भरणा करावा हे कळवुन सुध्दा रु. 4.00 चा भरणा केलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना दि. 30.4.2007 च्या अर्जाप्रमाणे माहितीकरीता रु. 4.00 चा भरणा केलेला नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 8.12.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1188–1191

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2305/2007.**

श्री अनंतकुमार टेटे
गोवर्धन नगर,
तुमसर ता. तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.)
नगर पालिका प्रशासन नागपूर विभाग
नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद तुमसर
ता. तुमसर जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.4.2007 रोजी माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मुख्याधिकारी के.डी.डेकापूरवार तथा सुनिल मेश्राम शिक्षा लिपीक न.प.इन्होने बगेर ठराव मंजुर के कस्तुरबा वि.के.वरिष्ठ लिपीक पद पर जकात मोहोरीर जयकांत मेश्राम को प्रमोशन दिया. प्राप्त जानकारी अनुसार यह कर्मचारी सेवा मे ज्युनियर है. रोष्टर के मुताबीक रोष्टर मे गलत बताकर मांगनेपर रोष्टर नदारत है ऐसा बताया जा राहा है. यह गलत प्रमोशन रद करने हेतु जिल्हा अध्यक्ष अंतोदय कामगार परीषद म.रा.कुभारे नगर तुमसर द्वारा ता. 30.6.2006 को जिल्हाधिकारी के तरफ प्रस्ताव दाखल कीया गया था. साथ मे प्रत इस केस मे अभितक क्यो कारवाही नही हुयी. हुयी तो क्या हुयी. केस दबाने मे कीस का हात है. ओरीजनल रोष्टर देखकर केस के कार्यवाही की जानकारी देवे.

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.5.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर यांनी अपीलकर्ता यांना माहिती देणे बाबत पत्र प्राप्त दि. 16.5.2007 रोजी प्राप्त झाले असल्यामुळे मागितलेली माहिती उपलब्ध असून सदर माहितीची छायांकित प्रत एक आहे तर आपण न.पा.फंडात एक छायांकित प्रतीचे शुल्क रु. 1.00 जमा करुन माहिती तात्काळ प्राप्त करवुन घ्यावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावरुन विहित मुदतीत माहिती पुरविण्यात आली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दि. 13.6.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय आयुक्त व प्रादेशिक संचालक नगर पालिका प्रशासन यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 5.7.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थी यांनी हा आदेश प्राप्त झाला नाही 7 दिवसाचे आंत विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेशित करीत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरची माहिती

आदेशाप्रमाणे दि. 5.7.2007 रोजी देण्यात आली असून ती यु पी सी ने अपीलकर्ता यांना पाठविण्यात आलेली आहे असे माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असून त्यांचा दि. 23.4.2007 चे अर्ज जिल्हाधिकारी भंडारा चे नावाने आहे म्हणून मागितलेली माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय मला मान्य नाही. जिल्हा अध्यक्ष अंत्योदय कामगार परिषद म. रा. यांचे दि. 30.6.2006 चे प्रस्तावावर जिल्हाधिकारी यांनी काय निर्णय दिला त्याची माहिती तसेच तुमसर न.पा.चे रोष्टर पाहुन माहिती पाहिजे ती मला मिळाली नाही. त्याकरीता अपील मेमोसोबत अपीलकर्ता जिल्हा अध्यक्ष अंत्योदय कामगार परिषद म. रा. या लेटरहेड वर दि. 30.6.2005 चे जिल्हाधिकारी भंडारा यांना दिलेले पत्राची छायांकित प्रत दाखल केलेली दिसून येते. सदरच्या प्रतीवर कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.भंडारा दि. 17.2005 अशा प्रकारचा स्टॅम्प दिसून येतो. अपीलकर्ता यांनी दि. 23.4.2007 च्या माहितीच्या अर्जामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या दि. 30.6.2005 च्या अर्जाचा चुकीचा उल्लेख करुन दि. 30.6.2006 अशी तारीख नमुद केलेली दिसून येते. परंतु दि. 30.6.2005 च्या अर्जावर काय कार्यवाही केली अशी माहिती जर जिल्हाधिकारी भंडारा यांना मागितलेली होती तर त्याबाबतची माहिती ही जिल्हाधिकारी भंडारा यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते अन्यथा दि. 30.6.2005 चा अर्ज हा मुख्याधिकारी यांचेकडे कारवाईसाठी हस्तांतर केलेला आहे व त्यामुळे अर्जदाराचा माहितीचा अर्ज हा मुख्याधिकारी यांचेकडे हस्तांतर करण्यात येत आहे. दि. 14.5.2007 च्या अर्जामध्ये कळविणे आवश्यक होते. व ही बाब अपीलकर्ता यांना कळविलेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाचे पुढे पुन्हा जिल्हाधिकारी यांनी माहिती दिली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय मला मान्य नाही असे द्वितीय अपीलाचे कारण दिलेले आहे. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी त्यांचेकडे अर्ज आल्यानंतर विहीत

मुदतीत कारवाई केलेली आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना द्वितीय अपीलाचे करण झालेले आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात माहिती मागितलेली असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व तशी ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. परंतु आयोगानी नोटिस काढतांना अपीलकर्ता यांनी अपील मेमोमध्ये व सोबत दिलेल्या कागदपत्राप्रमाणे नोटिस काढलेली असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी हजर नसल्यामुळे कोणताही निर्णय आयोगास देता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांचे दि. 23.4.2007 च्या अर्जाप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना 30.6.2006 (30.6.2005) च्या जिल्हाधिकारी यांना दिलेल्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक झाले आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 23.4.2007 च्या अर्जाप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना शाम बघेले यांच्या तक्रारीप्रमाणे 30.6.2006 (30.6.2005) च्या अर्जाप्रमाणे माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन द्यावी. जी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध नसेल ती माहिती मुख्याधिकारी नगर परिषद तुमसर यांचे कार्यालयातून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचेकडे पुढिल कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 8.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1192–1196

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2309/2007.**

श्री मोतेसिंग गन्यानसिंग नाईक
मु. तरोडा पो. कोथळी
ता. मोताळा जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहा. धर्मदाय आयुक्त बुलढाणा
2) श्री विजयसिंग भगवान नाईक
जन माहिती अधिकारी तथा
अध्यक्ष जनता शिक्षण मंडळ
मु. पो. कोथळी ता. मोताळा जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष जनता शिक्षण मंडळ हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी सहा. धर्मदाय आयुक्त यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.6.2007 रोजी (6.6.2007 रोजी) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष जनता शिक्षण मंडळ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. संस्थेच्या कॅशबुकाची झेरॉक्स सन 1990–91 व 1991–92 व 2006–07 ची कॅश बुकची झेरॉक्स तीन वर्षाची

2. संस्थेच्या आमसभेची प्रोंसीडींग बुकची व नोटीस बुकची नक्कल सन 1991 ते 2006–07 वर्षापर्यंतची झेरॉक्स प्रती.

3. संस्थेच्या कार्यकारीणी मंडळाची प्रोंसीडींग बुकची व नोटीस बुकची झेरॉक्स प्रती सन 2000–01 ते 2006–07 वर्षापर्यंतची झेरॉक्स प्रती.

4. संस्थेच्या आमसभेचे सभासदांची यादी, सभासदांची रितसर पावतीच्या झेरॉक्स प्रती.

माहितीचा विषय : 1. संस्थेच्या आमसभेची प्रोंसीडींग बुकची नक्कल प्रत

2. संस्थेच्या कार्यकारीणी मंडळाची सभेची प्रोंसीडींग बुकची नक्कल

3. संस्थेच्या आमसभेचे सभासदांची यादी, सभासदांची रितसर पावतीच्या झेरॉक्स

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 29.6.2007 रोजी रजिष्टर पोष्टाने माहितीच्या करीता अतिरिक्त शुल्क रु. 468 पोस्टाच्या खर्चासहीत पाठविण्यात यावे असे कळविलेले दिसून येते. परंतु तत्पुर्वी दि. 22.6.2007 रोजी अपीलकर्ता यांनी सहा. धर्मदाय आयुक्त यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 4.7.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलकार यांनी प्रस्तुत माहितीसाठी लागणारे आवश्यक व नियमानुसार असलेली फी ताबडतोब भरावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रु. 468 चा भरणा केला असला तरी माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

उत्तरवादी हा जनता शिक्षण मंडळ कोथळी हया सार्वजनिक विश्वस्त संस्थेचा जनमाहिती अधिकारी आहे. प्रस्तुत अपिलार्थीने दि. 1.6.2007 रोजी उत्तरवादीकडे त्याच्या अर्जामध्ये नमुद केलेली माहिती मिळणेसाठी अर्ज दिला होता. सदर अर्ज हया निवेदना सोबत जोडपत्र 1 म्हणुन दाखल केलेला आहे.

सदर अर्जाचा उत्तरवादीने विचार करुन अपीलार्थीला दि. 29.6.2007 रोजी माहितीचे संकलन केल्यानंतर कागदपत्रांच्या झेरॉक्स व पोस्टेजचा खर्च म्हणुन 468/– पाठवावे असे पंजिकृत डाकेने कळविले होते. सदर पत्राची प्रत व रजिस्टर्ड पोष्टाची पावती आधि पोच पावती जोडपत्र नं. 2 म्हणुन दाखल केली आहे.

अपीलार्थीने त्याला पाठविलेल्या जोडपत्र नं. 2 प्राप्त होवुनही त्याची पुर्तता न करता खोडसाळपणे व त्रास देण्याच्या हेतुने प्रथम अपीलीय अधिकारी मा. सहा. धर्मदाय आयुक्त बुलढाणा यांचेकडे अपील दाखल केले होते. सदर अपीलामध्ये उत्तरवादीनी सर्व वस्तुस्थिती कथन केली होती. अपीलामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीना माहिती देणे बाबत आदेश पारीत केला. त्याची प्रत जोडपत्र नं. 3 म्हणुन सादर केली आहे.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या आदेशा नंतर अपीलार्थीचे मनिऑर्डर द्वारे माहिती तयार करणेसाठी लागणा–या खर्चाची रक्कम पाठविल्या नंतर उत्तरवादीने दि. 20.7.2007 रोजी अपीलार्थीला पंजीकृत डाकेने माहिती पाठविली. त्याबाबत पाठविलेले पत्र व पोष्टाची पावती आधि प्राप्त स्विकृती रशीद जोडपत्र नं. 4 म्हणुन सादर केली आहे.

अपीलार्थीचे असे निवेदन की त्यास चुकीची माहिती दिली पुर्णपणे खोटे आहे उत्तरवादीने अपीलार्थीला त्यानी मागितलेली पुर्ण माहिती दिलेली आहे. अपीलार्थीने केवळ उत्तरवादीना त्रास देण्याच्या अप्रामाणिक हेतुने सदर अपील दाखल केलेले आहे.

अपीलार्थीला माहिती दिलेली असल्यामुळे अपीलार्थीचे अपील खर्च व दंडात्मक कारवाई सह खारीज करण्यात यावे.

सदरच्या खुलाशावरुन व आयोगाचे निदर्शनास आणल्यावरुन असे दिसून येते की उत्तरवादी यांनी दि. 21.7.2007 रोजी अपीलार्थी यांना पंजीकृत डाकेने माहिती पाठविलेली दिसून येते. पोष्टाची पावती आणि प्राप्त स्विकृती रशीद यावर अपीलकर्ता यांची माहिती मिळाल्याची सही दिसून येते. उत्तरवादी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता हे आजही सदरच्या संस्थेचे उपाध्यक्ष आहेत. यावरुन उत्तरवादी यांचे खुलाशावरुन असे दिसून येते की उत्तरवादी व अपीलकर्ता यांचे संस्थेत वाद आहे. अपीलकर्ता संस्थेचे उपाध्यक्ष असतांना 1990 पासूनची माहिती मागण्याची कोणतीही आवश्यकता नाही. त्यात कोणत्याही प्रकारचे जनहित दिसून येत नाही. व उत्तरवादी यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 8.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1197—1200

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2307/2007.**

श्री पी. पी. पप्पुवाले

गवळीपुरा, वार्ड क्र. 11,

पो. दिग्रस ता. दिग्रस जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

मुख्य कार्यपालन अधिकारी

जिल्हा परिषद यवतमाळ

2) जन माहिती अधिकारी तथा

गट विकास अधिकारी

पंचायत समिती यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. परंतु अपीलकर्ता यांना सदर माहितीच्या अर्जाप्रमाणे गट विकास अधिकारी पंचायत समिती यवतमाळ यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून माहिती मिळाल्याची अपीलकर्ता यांनी मला आज रोजी माहिती मिळाली आहे माझे समाधान

झाले आहे असे दि. 5.12.2008 रोजी लिहुन दिलेले आहे. तसेच जन माहिती अधिकारी गट विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती दिलेली असून याबाबत संबंधिताने काही तक्रार केल्यास त्याला ती माहिती देण्यास जबाबदार राहू असे लिहुन दिलेले असत्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

नागपूर

दि. 8.12.2008

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1201—1202

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2354/2007.**

श्री एच. आर. पहुजा

15/16, चिटणवीस नगर, बैरामजी टाऊन

नागपूर 440013 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अति. उपायुक्त

नागपूर महानगर पालिका नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

नागपूर महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.9.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.7.2007 रोजी सहा. आयुक्त मंगळवारी झोन 10 यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. उपर लिखे बिल्डींगपर कोई इलिगल बांधकाम वहा हुआ है

2. अगर ईलिगल बांधकाम हुआ है तो उसपर कारवाई हेतु कोई कोर्ट केस पेंडींग है या नही है तो किस स्टेज पर है

3. उस ईलिगल बांधकाम को गिराने के लिये एन.एम.सी.के पास कितना समय है. एन.एम.सी. कब उस बांधकाम को गिराने जा रही है

4. उस बांधकाम को गिराने के बारे मे मुझे एन.एम.सी. कोई सुचना दे सकती है या नाही

कृपया उपर लिखी बातों की माहिती मुझे तय समय मे देने की कृपा करे. 10 रु. का स्टॅम्प इस पर लगा दिया है अन्य कोई चार्ज है तो मै वह भरने को तैयार हूं.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 14.8.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.8.2007 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी तीन दिवसामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांना त्या आदेशानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्ता यांनी झोन 10 कडे माहिती मागितलेली होती व त्यावेळेस झोन 10 मध्ये जन माहिती अधिकारी नसल्यामुळे सदरची माहिती त्यांचेकडे दि. 10.10.2007 रोजी उपलब्ध करुन देण्यात आली असल्यामुळे दि. 20.10.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी वैयक्तिकरित्या पोच दिलेले दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की मी जी माहिती मागितलेली होती ती माहिती दिलेली नाही व त्यामुळे माहितीच त्यांना उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

अपीलकर्ता यांनी हाऊस नं. 500 वार्ड नं. 67/43 रेसिडेंन्सी रोड मालक सेवकराम नलवानी हयांच्या बिल्डींगबाबतची अनधिकृत बांधकामाची माहिती मागितलेली असल्यामुळे व अनधिकृत बांधकामाबाबत गेल्या 10 वर्षापासून महानगर पालिकेनीच त्यांचे विरुध्द केसेस दाखल केलेले असुनसुध्दा त्याबद्यलची निश्चित माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्या संदर्भामध्ये त्यांना निरनिराळया अर्जाच्या माध्यमातून अनेकवेळा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतु तरीही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या दि. 4.7.2007 (5.7.2007) च्या अर्जाप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयातसुध्दा जो निष्कर्ष काढलेला आहे त्यावरुन संबंधित जन माहिती अधिकारी किंवा सहाय्यक माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. वर नमुद केल्याप्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णयात हजर नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे ही आवश्यक होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की झोन 10 मध्ये जन माहिती अधिकारी नसल्यामुळे ती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज हस्तांतर केलेला होता. असे असले तरी अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता ज्या अधिका–याचे किंवा कर्मचा–याचे सहाय घेतले असेल त्यांना सुध्दा माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना ज्या अधिका–याने किंवा कर्मचा–याने माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला असेल त्याचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 2 प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शास्ती लादणे आवश्यक आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.7.2007 (5.7.2007) च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत हाऊस नं. 500 वार्ड नं. 67/43 रेसिडेंन्सी रोड मालक सेवकराम नलवानी या इमारतीच्या संदर्भामध्ये उपलब्ध असलेली बांधकाम संदर्भातील कागदपत्राच्या छायांकित प्रति रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे. रजिस्टर पोष्टाचा व छायांकित प्रतिचा खर्च हा संबंधित अधिकरी किंवा कर्मचारी यांनी स्वतः करावयाचा आहे.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 4.7.2007 (5.7.2007) च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे व माहिती अधिकारी यांना ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांनी माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असेल त्यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येवून अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिका–यानी हा निर्णय मिळाल्यापासून 3 महिन्याचे आंत करण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पुढिल कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. 16.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.1203–1206

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2357/2007.**

श्री श्रीधर आत्मारामजी मंगळे
मु. पो. लेहेगाव
ता. मोर्शी जि. अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार मोर्शी
ता. मोर्शी जि. अमरावती
2) जन माहिती अधिकारी तथा
तलाठी सा. क्र. 22
मौजा काटपूर (ममदापूर)
ता. मोर्शी जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.4.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा वाघोली शेत स. नं. 16/9 गट क्र. 54 सन 92–93, 93/94, 94/95, 98/99, 99/2000 ते 2002/2003, 06/07 चे 7/12 गाव नं 6,8 के. नं. 2073 दि. 20.1.2007 नमुना 9 चे नोटीस नुसार दि. 1.3.2007 रोजी आक्षेपचे लेखी उत्तर बाबत.

मौजा वाघोली शेत स. नं. 16/9 गट क्र. 54 चे शेताचे सन 1992 ते 2007 पर्यंतचे सात बारा आठ 6 अ. नमुना 9 चे नोटीस 1.3.2007 चे आक्षेपचे बाबत लेखी उत्तर.

सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार तसेच दारिद्रय रेषेखालील असे नमुद केलेले आहे. परंतु प्रमाणपत्र जोडलेले दिसून येत नाही. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 16.6.2007 रोजी तहसिलदार मोर्शी यांनी तलाठी वाघोली यांना मौजा वाघोली शेत स. नं. 16 गट क्र. 54 क्षेत्र 0.81 आर शेतीचे फेरफारावर घेतलेल्या आक्षेपा बाबतची माहिती महा. माहितीचा अधिकार अधिनिामान्वये अर्जदार यांनी मागितलेली आहे. मागितलेली माहिती परस्पर अर्जदार यांना द्यावी तसेच सदर माहिती या कार्यालयास सुध्दा सादर करुन कार्योत्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही किंवा माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलात अपीलकर्ता यांनी दि. 7.4.2007 व 12.2.2007 या दोन आर्जांचा उल्लेख केला आहे. परंतु दि. 12.2.2007 चा अर्ज त्यावरील प्रथम अपील हे दाखल केलेले नाहीत.

3. जन माहिती अधिकारी यांनी दि. 6.4.2007 चा अर्ज (7.4.2007) प्राप्त झालेला असुन सुध्दा त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली नाही याबाबत विचारले असता त्यांना सदरच्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये आकलन झालेले दिसून येत

नाही. अपीलकर्ता यांनी जो फेरफारास आक्षेप घेतलेला आहे त्या आक्षेपाच्या निर्णया संदर्भात झालेली कार्यवाही उपलब्ध करुन देणे अशी अपीलकर्ता यांची अपेक्षा दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने जे पत्र जन माहिती अधिकारी यांना पाठविलेले आहे त्यावरुन सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती असे दिसून येते व जन माहिती अधिकारी त्याबाबत दोषी आढळुन येतात. मात्र दि. 12.2.2007 च्या अर्जाच्या संदर्भात मागितलेल्या सात बाराचे सर्व उतारे त्यांना दिलेले आहेत असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांनी अनेक अर्ज केलेले असल्यामुळे त्याबाबत सरमिसळ झालेली दिसून येते व त्यामुळेच त्यांना सदरच्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली नाही असे दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी होवून निर्णय दिला असता तर द्वितीय अपीलाची आवश्यकता राहिली नसती असे असल्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून सदरचा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 6.4.2007 च्या अर्जाप्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) दि. 6.4.2007 च्या अर्जाप्रमाणे व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा तलाठी

यांना ताकीद देण्यात येत आहे. सदरच्या ताकीदीची नोंद त्यांच्या गोपनिय अहवालात घेणे आवश्यक आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 16.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.78–81

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2287/2007.**

श्री सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा
सेन्ट्रल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन
व्ही. आय. पी. रोड धरमपेठ नागपूर 440 01 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा व सत्र न्यायाधिश
जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर
2) श्री महम्मद नियाज
जन माहिती अधिकारी तथा
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर असुन अपीलकर्ता यांनी सदरच्या अपीलाच्या सुनावणीसाठी मुदत मिळावी अशी विनंती केलेली

आहे. परंतु अपीलकर्ता यांचे दाखल केलेले अपील मेमो तसेच जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादाचा विचार केला असता मुदतीची आवश्यकता आहे असे वाटन नाही. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून कागदपत्रे दाखल झालेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.6.2007 रोजी प्रबंधक माहिती अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायालय यांचेकडे ''मी दि. 5.1.2007 च्या तक्रारीवर हायकोर्टात कोणतीही कार्यवाही केल्याचे स्मरणात नाही करीता आपण माहिती दिल्याप्रमाणे कृप्या ज्या वृत्तपत्रात बातमी आली आहे त्या बातमीचे कात्रण देण्यात यावे आपल्या माहिती करीता माझे मुळ अर्ज व आपण दिलेल्या उत्तराची प्रत संलग्न आहे.''

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.7.2007 रोजी जन माहिती अधिकारी यांनी "The copy of Newspaper is not with the undersigned. Hence rejected" अशा प्रकारचे उत्तर दिलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.7.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.7.2007 रोजी देण्यात आलेला असून पुन्हा मागितलेली माहिती म्हणजे न्युज पेपर उपलब्ध नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे व्यथित होवून अपीलकर्ता यांनी पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

It is submitted that on 290602007 the appellant made an application under Right to Information Act. It is submitted that Shri A.G.Pandhoria then Registrar and Public Information Officer

Nagpur has express his inability to furnish the information asked for on account of the reason that the order passed by the Hon'ble Principle District and Sessions Judge Nagpur dated 6.1.2007 is communicated to him. The copy of News paper is with the then Registrar. Hence rejcected and informed as per office letter No. B-11(1)/2858/2007 dated 2nd July 2007.

It is further submitted that on 7.7.2007 the appellant has preferred First Appeal against the letter dated 2.7.2007 before the Hon'ble Principle District and Sessions Judge and Appellate Authority Nagpur. The Hon'ble Appellate Authority Nagpur after considering the same has passed that "Allowed". Inform that he had filed Transfer application High Court and its news published in News paper. Supply if available." The then Public Information Officer has informed vide its office letter No. B-11(1)/3876/2007 dated 2.7.2007 and informed him that the News paper is not available in the office.

Under these circumstances it is submitted that the appellant has been supplied correct and available information. In view of this there is no substance in the appeal the same is liable to be rejected.

व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली आहे किंवा प्रथम अपीलाचा जो निर्णय दिला आहे तो योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

अर्थातच ज्या वर्तमानपत्राची मागणी अपीलकर्ता यांनी केलेली आहे व ते उपलब्ध नाही असे त्यांना कळविण्यात आलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना जिल्हा व सत्र न्यायाधिश यांच्या दि. 22.5.2007 च्या आदेशाच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्याबाबत योग्य ती कार्यवाही योग्य त्या सक्षम अशा प्राधिकरणाकडे करता येईल. जी माहिती उपलब्ध नाही ती उपलब्ध करुन देता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. **5.12.2008**

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.82—85

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2331/2007.**

श्री जवाहरलाल श्रीलाल दुबे
शिवाजी नगर, सुतगिरणी जवळ
अमरावती ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती
2) श्री आर. जी. पशने
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.7.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता तसेच अपीलार्थी तर्फे ॲड. एम. आर. राजगुरे हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.4.2007 रोजी मुख्य कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

a) Why decision against my representation dated 4.4.2006 not communicated till to date by Enquiry Officer and your office-Records and grounds for the under Rules.

b) Copy of voucher proving financial decision and the payment of Rs. 22,60,475/- is made by me under delegated power as stated in your letter No. 473/07 dated 8.2.2007 bearing signature of Shri Gawande Deputy Engineer (Mechanical).

c) Copy of preliminary enquiry report made by Shri Gawande Deputy Engineer against conclusion of recovery Rs. 22,60,475/- in first show cause notice dated 8.2.2007 with proof evidence collected.

d) Copy of evidence witness recorded in enquiry proceeding of Shri Gawande Deputy Engineer Mechanical and proved the amount Rs. 22,60,475/- is recoverable from me as stated in your letter No. 473/07 dated 8.2.2007 with documentary proof.

e) Which article of charges amount Rs. 22,60,475/- is pertains vide charges leveled on 17.10.02 and 18.11.02 in enquiry by whom witness on evidence Rs. 22,60,475/- is proved recoverable from me. Copy of evidence.

f) Decision against representation dated 5.3.2007 and 27.3.2007 Parawise- with specific denial decision.

g) Copy of oral vidence recorded in enquiry proceeding by the Enquiry Officer of the witness proving Rs. 75,19,857/- is paid by me under delegated power proving vouchers etc. Copy of evidence to sustain the recovery Rs. 75,19,857/- in your letter dated 7.4.2007.

h) Copy of details of voucher consisting amount Rs. 75,19,857/- is pertains to final decision taken.

i) Which article of charges leveled on 17.10.02 and 18.11.02 is pertains the proposed recovery amount sustained Rs. 75,19,857/-.

j) Why under Rule 99 Maharshtra Zilla Parishad, Panchayat Samiti Account Code 1968 the Concerned Executive Engineer, Deputy Engineer concerned are not held responsible for amount Rs. 22,60,475/- or Rs. 75,19,857/-.

k) Why under Rule 4.1.2 to 4.1.3 and 6.1.1 to 6.1.3 Maharshtra Public Works Accounts Code, the Chief Accounts Officer or other Audit Officers not held responsible for proposed financial amount recoverable Rs. 22,60,475/- or Rs. 75,19,857/- when payment made by them.

l) Copy of decision against representation dated 24.4.2007.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 4.6.2007 रोजी (3.5.2007) (10.5.2007 रोजी) कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यांनी अपीलकर्ता यांना आपल्या माहितीचे अधिकारातील आपण मागविलेले सर्व कागदपत्रे हे आपले विरुध्दच्या विभागीय चौकशी संबंधी आहे. आणि सदर विभागीय चौकशी सद्यस्थितीत निकाल देण्याचे अंतिम टप्प्यावर आहे. त्या सर्व मुद्या बाबत चौकशी वेळी उहापोह झालेला आहे. करीता आता अशा स्थितीमध्ये चौकशीचा अंतिम आदेश होईपावेतो आपणास सदर माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम (8) नुसार पुरविता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराच्या अनुषंगाने दि. 18.6.2007 रोजी अपीलकर्ता यांनी आक्षेप घेणारे निवेदन कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यांना दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतर दि. 7.6.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी प्रथम अपील त्यांनी विभागीय आयुक्त अमरावती यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीला नंतर पुन्हा दि. 12.4.2007 रोजी अपीलकर्ता यांनी विभागीय आयुक्त अमरावती यांना निवेदन सादर केलेले दिसून येते. दि. 10.6.2007 रोजी आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांनी प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचेकडे परस्पर अर्ज करुन आवश्यक ती दाद मागावी. दि. 18.7.2007 रोजी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जानुसार निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यात दिनांक 4.7.2007 चे पत्र योग्य आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की चौकशी ही 2006 मध्ये पुर्ण झाली होती आणि बडतर्फीचे आदेश हे दि. 6.6.2007 रोजी पारीत करण्यात आले होते. व त्यामुळे चौकशी अहवाल हा तयार होता असे दिसून येते व त्याबाबतची

कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु कोणत्याही विभागीय चौकशीमध्ये कारणे दाखवा नोटिसी पासून प्रथम अहवाला पासून ते अंतिम निर्णय होईपर्यंत ती विभागीय चौकशीची प्रक्रिया समजली जाते व त्यामुळे चौकशी अहवाल तयार झाला असला तरी त्यावर अंतिम निर्णय जोपर्यंत होत नाही तोपर्यंत ती प्रक्रिया सुरु आहे असे गृहीत धरावे लागते व सदरच्या प्रकरणामध्ये दि. 24.4.2007 रोजी अर्ज केल्याच्या वेळेस सदरची प्रक्रिचा पुर्ण झाली नव्हती व त्यामुळे सदरचे उत्तर देण्यात आलेले आहे हे योग्य आहे. प्रथम अपीलाचा निणयसुध्दा योग्य आहे. परंतु आता संपुर्ण चौकशीची प्रक्रिया ही पुर्ण झाली असल्यामुळे व अपीलकर्ता हा बडतर्फ झाला असल्यामुळे अपीलकर्ता यांच्या दि. 24.4.2007 च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्यामुळे त्यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपीलकर्ता यांना माहिती अर्ज हा दि. 24.4.2007 रोजी दाखल केला होता. सदरचा अर्ज जरी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर केला होता तरी सुध्दा सदरच्या अर्जाची सादर करण्याची तारीख 24.4.2007 हीच अधिनियमाप्रमाणे आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेकडे तो दि. 10.5.2007 रोजी जरी हस्तांतर झालेला असला तरी दरम्यानच्या विलंबास जो अधिकारी किंवा कर्मचारी जबाबदार असेल तो त्या अधिकारी किंवा कर्मचा–याच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे व त्याकरीता सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 24.4.2007 च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय कागदपत्रे छायांकित प्रतिच्या स्वरुपात रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता यांनी दि. 24.4.2007 रोजी अर्ज दाखल केल्यानंतर तो जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे हस्तांतर होईपर्यंतचा कालावधीचा विलंब ज्या अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यामुळे झालेला असेल त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांना लागू असलेल्या सेवानियमाप्रमाणे त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना स्वतंत्रपणे पुढिल कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. **12.12.2008**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord3.86–91

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2337/2007, 2338/2007, 2339/2007, 2340/2007.**

श्री श्रीकांत भगवानदास पटेल
बिर्ला कॉलनी, जठार पेठ, अकोला
ता. जि. अकोला ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता
महा. राज्य विद्युत वितरण कं. मर्या. (शहर विभाग) अकोला
विद्युत भवन, रतनलाल प्लॉटस, अकोला 444005.
2) जन माहिती अधिकारी तथा
महा. राज्य विद्युत वितरण कं. मर्या. (शहर विभाग) अकोला
विद्युत भवन, रतनलाल प्लॉटस, अकोला 444005. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.6.2007 रोजी एकुण चार द्वितीय अपीले राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेली आहेत. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. उत्तरवादी तर्फे ॲड. रुपेश इस्तापे हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी अपील क्र. 2337/07 मध्ये दि. 10.4.2007 रोजी जन माहिती अधिकारी मुख्य अभियंता कार्यालय महा. राज्य विद्युत वितरण कं. मर्या. शहर अकोला यांचेकडे दि. 26.3.2007 रोजी ची माहिती सोबत दिलेल्या पत्राप्रमाणे मागितलेली दिसून येते.

दिनांक 23.3.2007 रोजीचे पत्र क्र. 681 व विज चोरीचे आकारणी देयक बद्यल मला Hon'ble II Adhok Judge Akola यांचे आदेशाची झेरॉक्स देण्यात यावी ज्यामध्ये आपणास मला बिल देण्याचे आदेश झाले आहे व त्या आदेशामध्ये कोणत्या परिच्छेदात तो आदेश आहे त्यावर निशानी करुन माहिती देण्यात यावी. कारण माझ्या जवळ जी अपील क्र. 22/07 ची आदेशाची प्रत आहे त्यामध्ये असे नमुद नाही. करीता जी मुच्या जवळ स्पेशल आदेशाची प्रत आहे ती देण्यात यावी की कोठे असे ऑर्डर केले आहे की विज चोरीचे देयके देण्यात यावे. माझ्या जवळ जी कॉपी आहे त्यामध्ये कुठेही असे लिहिले नाही की The bill is issue as per order of Hon'ble II Adhok Judge Akola जे आपण आपल्या देयकामध्ये लिहिले आहे. तरी तुमच्या जवळ कोणती स्पेशल ऑर्डर कोर्टानी दिली आहे त्याची प्रत मला तत्काळ देण्यात यावी. ही विनंती. मी नियमाप्रमाणे कायदेशीर शुल्क भरण्यास तयार आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 17.5.2007 रोजी सदरच्या माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी संदर्भांकित विषयानुसार आपणास कळविण्यात येते की श्री श्रीकांत भगवानदास पटेल रा. बिर्ला कॉलनी अकोला यांनी मागितलेली माहिती अद्यापपर्यंत आपण त्यांना दिलेली नसल्यामुळे त्यांनी हया कार्यालयाला अपील पाठविलेले आहे. परंतु हया केसमध्ये आपणच अपीलीय अधिकारी असल्या कारणाने संबंधीत ग्राहकाचा मुळ अपील अर्ज व इतर सर्व कागदपत्रे पुढील

त्वरीत कार्यवाही करण्यासाठी अपणाकडे पाठवित आहे. आपण श्री पटेल यांच्या अपीलाची दखल घेवून त्यांना त्वरीत मागितलेली माहिती परस्पर पाठवावी व त्याची एक प्रत हया कार्यालयाला द्यावी. अपीलकर्ता हयांनी सदरच्या अपीलाच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपील मेमोमध्ये कारण दिलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या दि. 10.4.2007 च्या माहिती मागण्याच्या अर्जावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांची विज चोरी पकडलेली होती व त्या संदर्भामध्ये ते अनेक अर्जाच्या माध्यमातून माहिती मागणे सुरु केले आहे असे दिसून येते. त्यावरुन सदरच्या माहिती मागण्याच्या अर्जावरुन कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

3. अपीलकर्ता यांनी अपील क्र. 2338/07 मध्ये दि. 27.1.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता महा. राज्य विद्युत वितरण कं. मर्या. अकोला यांचेकडे दि. 5.12.2007 या अर्जाच्या कालावधीची माहिती सोबत जोडलेल्या परिपत्रकावरुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.2.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती अधिकारी यांनी दि. 5.12.2006 अकोला शहर विभागाच्या भरारी पथकाने स्थळ तपासणी अहवालाची छायांकित प्रत आपणाकडे दिली आहे. त्यामध्ये विद्युत उपकरणाला जोडलेला सलग्न भार, विजचोरी आढळुन आलेल्या महावारी विज युनिट आकारणीची माहिती आपणास दिली आहे. सध्या विज चोरीच्या आकारणी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे अतिरिक्त माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 14.2.2007 रोजी महा. राज्य विद्युत वितरण कं. मर्या. अकोला यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यात माहिती चुकीची देण्यात आली असुन अर्धवट माहिती देण्यात आल्यामुळे सदरची माहिती 48 तासात दिली पाहिजे होती. परंतु एक महिन्यावर माहिती दिल्या बद्यल सोबत परिपत्रक जोडलेले आहे. दि. 26.12.06 रोजी मी माझया घरचे सर्व

उपकरण किती तास वापर करण्यात आला आहे त्यासंबंधीची फॉरमॅटमध्ये डिटेल्स माहिती मागितली होती परंतु त्यांना डिटेल न देता टोलमटाली करुन व विनाकारण विलंब करुन चुकीची दिली व सध्या कोर्टात न्यायप्रविष्ट काहीच नाही असे कारण दिलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती अधिका–याने अपीलकर्त्यास दिलेली माहिती पूर्ण असून तांत्रिक ज्ञान असलेल्या व्यक्तिस समजण्यासारखी आहे. तसेच जर अपीलकारावर वीज चोरी प्रकरण न्यायप्रविष्ट असेल तर दिलेली माहिती योग्य आहे. सोबत अपीलकाराचे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. वरील प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय व जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती हे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपीलकर्ता यांनी अपील क. 2339/07 मध्ये दि. 22.12.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता सब डिव्हीजन नं. 3 महा. राज्य विद्युत वितरण कं. मर्या. अकोला यांचेकडे दि. 1.4.2007 ते दि. 22.12.2007 या अर्जाच्या कालावधीतील सोबत जोडल्याप्रमाणे सहा मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.12.2007 रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.5.2007 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिका–याने अपीलकारास दिलेली माहिती त्रोटक जरी आहे तरी ती माहिती योग्य आहे सबब अपीलकाराचे अपील फेटाळण्यात येत आहे

असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे दिलेली माहिती व प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

5. अपील क्र. 2340/07 मध्ये दि. 26.12.2006 रोजी अपीलकर्ता यांनी शासकीय माहिती अधिकारी कार्यकारी अभियंता यांचेकडे माझ्या घरचा विज पुरवठा दि. 5.12.2007 रोजी खंडीत करण्यात आला आहे तरी मला माहिती देण्यात यावी की कोणत्या कायद्या अंतर्गत माझा विज पुरवठा खंडीत केला आहे. संपुर्ण ॲक्ट कायदा व कलमाची माहिती देण्यात यावी. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.2.2007 रोजी आपल्या विद्युत कनेक्शनचा विज पुरवठा भारतीय विद्युत अधिनियम 2003 च्या तरतुदीनुसार बंद करण्यात आला आहे. विज अधिनियम 2003 चे पुस्तक बाजारात विक्रीकरीता उपलब्ध आहे असे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 6.2.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी अंतर्गत माहितीचा अधिकार अधिनियम 2005 प्रमाणे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 29.5.2007 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिका–याने अपीलकारास दिलेली माहिती त्रोटक असुन अपीलकाराचे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्या निर्णयामुळे व्यथित झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे दिलेली माहिती योग्य आहे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

6. अपीलकर्ता यांच्या वरीलप्रमाणे माहितीच्या अर्जाच्या संदर्भामध्ये गैरव्यवहार म्हणजे उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

तक्रारकर्त्यास वितरण कंपनीचे विद्युत मंडळ हयांचे मार्फत घरगुती वापराकरीता विद्युत पुरवठा करण्यात आला होता. दि. 5.12.2006 रोजी वितरण कंपनीस मिळालेल्या गुप्त माहितीवरुन तक्रारकर्त्याच्या घरील विद्युत पुरवठयाची आकस्मिक तपासणी करण्यात आली होती त्यामध्ये तक्रारकर्त्याच्या घरामध्ये विचेजची चोरी होत असल्याचे उघडकिस आला, तपासणी अधिका–यानी पुढील कार्यवाहीसाठी तक्रारकर्त्याच्या इमारतीतील मिटर विद्युत कायदर 2003 चे तरतुदी अंतर्गत जप्त केले होते. त्यामुळे तक्रारकर्त्याचा विद्युत पुरवठा बंद पडला होता.

तक्रारकर्त्याने दि. 26.12.06 रोजी त्याचे घरचा विद्युत पुरवठा कोणत्या कायद्याप्रमाणे बंद करण्यात आला आहे. याबाबतची माहिती मागीतली होती त्यानुसार माहिती अधिकारी यांनी आपले पत्र क्र. 504 दि. 2.2.07 अन्वये तक्रारकर्त्यास भारतीय विद्युत अधिनियम 2003 चे तरतुदी अन्वये विद्युत पुरवठा बंद असल्याबाबत व सदरहु पुस्तक कोणाकडे विक्रीस उपलब्ध याबाबतची माहिती पुरविली होती. सदरहु माहिती पुरवुनही तक्रारकर्त्याने प्रथम अपील उपकार्यकारी अभियंता यांचेकडे सादर केले होते. अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थी व माहिती अधिकारी यांना दि. 3.5.07 रोजी अपीलाचे सुनावणीकरीता उपस्थित राहण्याचे सुचीत केले होते व दोघांचाही युक्तीवाद ऐकल्यानंतर दि. 19.5.07 रोजी आपली आदेश पारीत केला.

अपीलर्थीचे अपीलात कोणत्याही कायदयाचा मुददा नसून त्याने मागितलेली माहिती ही स्वहिता करीता असून त्यामध्ये व्यापक जनहिताकरीता मागितलेली नाही. करीता अपीलार्थीचे अपील हे खारीज करावे.

माहितीचे अधिकाराचा कायदयाचे तरतुदी अंतर्गत शहर विभागात माहिती अधिकारी यांची नेमणुक होती त्यांचे आदेशाचे विरुध्द प्रथम अपील उपकार्यकारी अभियंता मंडळ कार्यालय यांना अपीलीय अधिकारी म्हणुन नेमले होते. माहे ऑक्टो. 2008 पासुन मंडळ कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी यांचे पद रदद करुन प्रथम

अपीलीय अधिकारी म्हणुन कार्यकारी अभियंता शहर विभाग अकोला यांना मुख्य अभियंता यांचे आदेशानुसार नेमलेले आहे. सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी वरीलप्रमाणे सर्व माहिती ही विज चोरी पकडल्यामुळे मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे आयोगापुढे पुर्वीही विज चोरी संदर्भात अपीले सुनावणीस आली होती व ती सर्व खारीज केलेली आहेत. यावरुन अपीलकर्ता यांनी व्यापक जनहिता करीता मागितलेली नसुन स्वहिताकरीता मागितलेली दिसून येते व तसा अधिनियमाचा उद्येश नाही.

**आ दे श**

1) अपील क्रमांक 2337/2007, 2338/2007, 2339/2007, 2340/2007 ही खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. **12.12.2008**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.92–98

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2366/2007.**

श्री राजेंद्र भास्कर शेळके
मु. पो. पेठ
ता. चिखली जि. बुलढाणा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा कृषी अधिक्षक बुलढाणा
ता. जि. बुलढाणा
2) श्री एस. पी. काळे
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी चिखली
ता. चिखली जि. बुलढाणा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.2.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून तालुका कृषी अधिकारी चिखली यांचे कार्यालयात सन 2005–07 चिखली तालुका अंतर्गत माती नाला बांधकाम व तुटफुट बाबत 7 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची महिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 17.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचासुध्दा निर्णय झालेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी कार्यालय तालुका कृषी अधिकारी चिखली यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

अर्जदार श्री राजेंद्र भास्कर शेळके मु. पो. पेठ यांचा अर्ज दि. 22.3.2007 रोजी या कार्यालयास प्राप्त झाला. अर्ज प्राप्त झालेल्या कालावधीमध्ये कृषि विभागाकडून शेतकरी आत्महत्याच्या पार्श्वभुमीवर मा. पंतप्रधान पॅकेज अंमलबजावणी जसे अनुदान तत्वावर बियाणे वाटप कार्यक्रम, चेक डॅम इ. व महाराष्ट्र शासन पॅकेज अंतर्गत कै.वं. नाशे.स्वा.मिशन, विदभ्र पाणलोट विकास कार्यक्रम व शासनाच्या नियमित योजना तसेच दि. 5 व 6 ऑगष्ट 2006 रोजी झालेली अतिवृष्टी मुळे पिके व जमीन खरडून गेल्यामुळे शेतक–यांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले होते. त्यांची नैसर्गिक आपत्ती अंतर्गत मदत वाटप करुन खरडून गेलेल्या जमिनीचे अंदाजपत्रक तयार करणे. या व्यतीरिक्त कापुस लागवड केलेल्या शेतक–यांचे क्षेत्र प्रादुर्भावाची आर्थीक मदत वाटप करणे व वेळोवेळी वरिष्ठ कार्यालयास दयावी लागणारी माहिती आणि क्षेत्रीय कामे तसेच कार्यालयातील अपुरा कर्मचारी वर्ग या सर्व बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार करता संबंधीत अर्जदारास अनावधानाने माहिती देण्या संदर्भात पाठपुरावा होवू शकला नाही व अर्जदार श्री राजेंद्र भास्कर शेळके मु. पो. पेठ यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे

अपीलीय अर्ज सादर केलेला नाही. तसेच माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी कार्यालय चिखली येथील मंडल कृषि अधिकारी यांनी मागितलेली माहिती ही अन्य मंडल कृषि अधिकारी यांचेकडे असल्यामुळे त्यांनी दि. 16.4.2007 रोजी पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्राच्या अनुषंगाने दि. 27.4.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु मंडल कृषि अधिकारी चिखली, नेरा, सेलचुर यांनीसुध्दा माहिती संकलित करण्याकरीता उपलब्ध करुन दयावी म्हणून पत्र दिलेले दिसून येते. परंतु त्यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. यावरुन अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यास माहिती अधिकारी यांनी ज्यांचे सहाय घेतले ते मंडल कृषि अधिकारी चिखली, नेरा, सेलचुर यांना अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजणे आवश्यक आहे व त्यामुळे विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून मंडल कृषि अधिकारी चिखली, नेरा, सेलचुर यांनी शासकीय माहिती अधिकारी तालुका कृषी अधिकारी कार्यालय चिखली यांचे पत्रानुसार विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे व त्याकरीता अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे दोषी आढळुन येत असल्यामुळे

त्यांचेविरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

2) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हा कृषी अधिक्षक बुलढाणा यांनी करावयाची आहे व त्याकरीता सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे जिल्हा कृषी अधिक्षक बुलढाणा यांचेकडे पुढिल कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
दि.**17.12.2008**

( विलास पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord1.99–102

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2367/2007.**

श्री विलास दत्तराव चव्हाण
सिध्देश्वर, बोरवन, उमरखेड
ता. उमरखेड जि. यवतमाळ ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
साखर आयुक्त पुणे
साखर आयुक्तालय साखर संकुल
शिवाजीनगर पुणे – 5.
2) जन माहिती अधिकारी तथा
प्रादेशिक सहसंचालक (साखर) अमरावती
सहकार संकुल, कमिश्नर ऑफीसजवळ, अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता यांनी यापुर्वीही प्रादेशिक सहसंचालक यांचेकडे अनेक अर्जामधून माहिती मागितलेली दिसून होती. आयोगाकडे त्यांचे अनेक अपीले सुनावणीस आली होती. अपीलकर्ता कोणत्याही अपीलाच्या सुनावणीस स्वतः हजर राहात नाहीत असे आढळुन आलेले आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2006 रोजी माहिती अधिकारी म्हणून प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे कार्यालयामध्ये वसंत सहकारी साखर कारखाना वसंतनगर पोफळी ता. उमरखेड जि. यवतमाळ हया संस्थेच्या संचालक ॲड. संतोष जैन, नारायण क्षिरसागर, प्रदीप दिवसरकर यांनी अपात्र घोषित करण्याबाबतच्या विलास दत्तराव चव्हाण सभासद व पत्रकार उमरखेड यांचे तिन्ही तक्रारीविषयी वरील तपशिलाप्रमाणे माहिती मिळणेबाबत. तक्रारीची तपशिलवार माहिती गैरअर्जदारांचा बचाव पुरावे रोजनाम्यातील प्रत्येक तारीख व कार्यवाही निर्णय, विलंबाची कारणे, अर्जदारास संधी दिली नाही त्याची कारणे वरील माहितीच्या तपशिलाप्रमाणे सर्व तपशिलवार माहिती द्यावी. सदरची महिती टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 4.4. 2007 रोजी प्रथम अपील साखर आयुक्त पुणे यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 18.6.2007 रोजी साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी सदर अर्जामध्ये आपण या कार्यालयाकडे सादर केलेल्या अर्जाच्या बाबत कळविण्यात येते की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या संदर्भात मागणी केलेली माहिती प्राप्त न झाल्याने त्या संबंधी अपील चालविण्याचे अधिकार माहिती आयोग यांचेकडे असल्यामुळे कृपया आपण अपील माहिती आयोगाकडे दाखल करावे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 10.11.2006 च्या अर्जाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी असे सांगितले की सदरचा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरावे लागते. प्रथम अपीलीय अधिकारी तथा साखर आयुक्त यांनी दि. 18.6.2007 चे उत्तर दिलेले आहे. ते अधिनियमाच्या तरतुदीची माहिती न घेता दिलेले आहे. विषयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) खाली अपील असे त्यांचे पत्रात नमुद केलेले असुनसुध्दा प्रथम अपीलाच्या संदर्भात माहिती न देता माहिती आयोगाकडे अपील आहे असे उत्तर दिलेले दिसून येते व त्यावरुन साखर आयुक्त यांना अधिनियमाच्या तरतुदींची माहिती दिसून येत नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही असे असले तरी माहिती अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक (साखर) अमरावती यांनी खालीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

श्री विलास दत्तराव चव्हाण संपादक सा. जय राजसिहासन सिध्देश्वर नगर, बोरवन, उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ यांचा दि. 10.11.2006 चा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा अर्ज या कार्यालयाचे रेकॉर्ड नुसार प्राप्त झालेला नाही त्यामुळे माहितीच्या अर्जावार कार्यवाही करण्याचा प्रश्न उदभवत नाही.

तथापि अपिल कर्ता यांचे या कार्यालयास वसंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्री प्रदीप विठठलराव दिवसरकर ॲड. संतोष जैन, व श्री नारायण रामभाउ क्षिरसागर यांना अनुक्रमे दि. 17.7.2006,12.5.2006 व 9.6.2006 अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 73 फ फ अनुसार वसंत सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदावरुन कमी करण्याबाबत तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानुसार या कार्यालयाने सदर तक्रार अर्ज 30.3.2007, 14.8.2007 व 30.3.2007 अन्वये निकाली काढण्यात आले असुन सदर निकालाच्या प्रती अर्जदार विलास दत्तराव चव्हाण यांना पुरविण्यात आल्या आहे. सुलभ संदर्भाकरीता निकालाच्या प्रती या समवेत सविनय सादर.

प्रस्तुत प्रकरणी असे निदर्शनास येते की, अपीलकर्त्याने वरील प्रकरणात माहितीच्या अधिकारा अंतर्गत कसल्याही प्रकारचा अर्ज केलेला नाही. अपीलकर्त्याने तक्रार अर्जाच्या कार्यवाहीवर आपणाकडे अपील केल्याचे दिसते. वरील बाब लक्षात घेता अपीलकर्ता या कार्यालयास जाणुन बुजुन त्रास देत असुन त्याला माहिती मिळण्यापेक्षा कार्यालयास कसे अडचणीत आणता येईल अशी वरील कृती असल्याचे दिसुन येते. तेव्हा सदर प्रकरणी आपले स्तरावरुन योग्य निर्णय व्हावा ही विनंती. करिता सदरचा जबाब सविनय सादर.

सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांच्या तक्रार अर्जावार त्यांना पुर्वीच माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना पुर्वीच उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये दि. 14.8.2007 व 30.3.2007 पत्राची छायांकित प्रत जोडण्यात आलेली आहे व त्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांच्या तक्रारीवर जी कार्यवाही झालेली आहे त्या कार्यवाहीची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यामुळे पुन्हा पुन्हा तीच तीच माहिती मागणे हे अयोग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांच्य दि. 10.11.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती ही पुर्वीच उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 17.12008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2731/2007.**

श्री प्रकाश मुकुंदराव पंत
डि–1, पहिला माळा, संजय अपार्टमेंट
प्लॉट नं. 274, धरमपेठ विस्तार,
शिवाजी नगर, नागपूर 440 010. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री के. एस. फनी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
महाव्यवस्थापक (नि.)
औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर 441 102
2) जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता (नि.) प्रशासन
मुख्य महाव्यवस्थापक (नि.)
कार्यालय औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर 441 102 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.9.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.4.2007 रोजी जन माहिती अधिकारी संचालक सुरक्षा व दक्षता विभाग म.रा.वि.मं.होल्डींग कं. मर्या. मुंबई यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

दि. 12.10.2006 रोजी मुख्य महाव्यवस्थापक (नि.) कार्यालय औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा जि. नागपूर मार्फत दिलेल्या तक्रारीबाबत. माहितीचा कालावधी दि.12.10.06 ते 15 एप्रिल 2007.

माहितीचे वर्णन 1. अर्जावर दररोज काय कार्यवाही झाली त्याचा अहवाल

2. अर्जावर कार्यवाही करण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिका–याचे नाव

3. या अधिका–याने काय निर्णय घेतला

4. या निर्णयानुसार काय कार्यवाहीचा आदेश देण्यात आला व असा आदेश दिला नसल्यास तो कधी देण्यात येणार आहे.

5. तक्रार अर्जावरील संचालक सुरक्षा व दक्षता यांच्या अभिप्रायाची संदर्भांकित प्रत दयावी

सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे. व सोबत दि.12.10.06 च्या तक्रारीची प्रत जोडण्यात आलेली आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दि. 16.7.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक 20.7.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी व मुख्य महाव्यवस्थापक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांन दि. 17.8.2007 रोजी आपला दि. 12.10.2006 व दि. 9.1.2007 चा अर्ज मुख्य महाव्यवस्थापक (नि.स.व सु.)

कार्यालयाने मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा) म.रा.वि.मं.कं.मर्या.,प्रकाशगड,बांद्रा (पुर्व) मुंबई यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीस्तव पत्र दि. 17.8.2007 अन्वये पाठविला आहे असे कळविलेले दिसते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी दि. 12.9.2007 रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की दिनांक 16.7.2007 रोजी जी माहिती त्यांना त्यांच्या दि. 23.4.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने कळविण्यात आली ती माहिती ही त्यांच्या दि. 31.10.2006 च्या नोटिसीच्या संदर्भात दिली आहे व त्यामुळे सदरची माहिती दिशाभूल करणारी व चुकीची आहे. त्यावन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की अपीलकर्ता यांचे दि. 12.10.2006 व दि. 9.1.2007 च्या तक्रारीमधील मुद्दे उवस्थित केले होते त्या मुद्यांपैकी काही मुद्यावर दक्षत विभागाने चौकशी केली होती. दक्षता विभागाने काढलेल्या निष्कर्षाच्या आधारे श्री पंत यांना आरोपपत्र देवून विभागीय चौकशी करण्यात आली होती. त्यांच्या मुद्यातील सारखेपणामुळे कदाचित माहिती आकिारी यांनी पत्र क्र. 565 दि. 16.7.2007 अन्वये श्री पंत यांच्या दि. 21.4.2007 व 23.4.2007 च्या अर्जानुसार माहिती देण्याऐवजी दिनांक 31.10.06 च्या अर्जावर अनवधानाने माहिती दिली असावी. माहिती अधिकारी यांनी जरी अनवधानाने दुस–याच अर्जाबाबत माहिती दिली असली तरी अपील अधिकारी यांनी योग्य ती माहिती श्री पंत यांना दिली आहे. येथे नमुद करावेसे वाटते की या कार्यालयात आजपावेतो माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत एकूण 15 अर्ज/अपील प्राप्त झाले असून त्यातील 44 अर्ज/अपील श्री पंत यांनी स्वतः व त्यांचे वतीने डॉ. गजानन लांजेवार उपाध्यक्ष सिटीझान्स फोरम नागपूर यांनी केलेले आहे आणि त्या सर्व अपील/ अर्जाची माहिती त्यांना वेळोवेळी माहिती अधिकारी/अपील अधिकारी यांनी दिलेली आहे. यावरुन माहिती अधिकारी/अपील अधिकारी हे माहिती देण्यात कुचराई करीत नाही हे दिसून येईल.

4. असे असुन सुध्दा अपीलकर्ता यांनी दि. 12.10.2006 चा तक्रार अर्ज हा मुख्यालयात पाठविण्यात येवू नये असे दि. 28.11.2006 रोजी संबंधित कार्यालयामध्ये कळविलेले होते व तो अर्ज जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणलेला आहे. असे असून सुध्दा अपीलकर्ता यांनी मात्र शासकीय माहिती अधिकारी संचालक सुरक्षा व दक्षता विभाग म.रा.वि.मं.होल्डींग कं. मर्या. मुंबई यांचेकडे पाठविलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता स्वतःच केलेल्या कृतीच्या बद्यल इतरांना दोषी धरण्याचा प्रयत्न करीत आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांचे विरुध्द विभागीय चौकशी होती असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच त्यांनी दाखल केलेल्या खुलाशावरुनही दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता व त्यांचे सहयोगी यांनी एकुण 44 अर्ज किंवा अपील दाखल केलेले दिसून येते. त्यामुळे त्यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित आहे असे दिसून येत नाही. त्यांनी व त्यांचे सहयोगी यांनी सर्व अर्ज स्वहिताकरीता दाखल केलेले दिसून येतात किंवा त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु केली होती म्हणून दाखल केलेले दिसून येतात. व हा हया अधिनियमाच्या तरतुदीचा गैरवापर आहे. वास्तविक सिटीझन्स फोरम या सारख्या संस्थेनी अशा प्रकारच्या गैरवापरास साथ देणे हे अयोग्य आहे. अधिनियमाचा हेतू हा पारदर्शकता व जबाबदारी निश्चित करण्याकरीता आहे. व ते व्यापक जनहिताच्या दृष्टीने होते. सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या प्रकरणाच्या संदर्भातून अशा प्रकारची अनेक अर्ज करुन माहिती मागितलेली दिसून येते. यावरुन आकसाने त्रास देण्याचा हेतू दिसून येतो व अशा प्रकारे अनेक अर्ज केल्यामुळे त्याबाबतचा संभ्रम हा नैसर्गिकपणे जन माहिती अधिकारी यांच्यावर होवू शकतो व त्यामुळेच त्यांनी जी माहिती दिलेली आहे ती अपीलकर्ता यांच्या अनेक अर्जाच्या एकत्रित मुद्याच्या संदर्भात असल्यामुळे ती अनवधानाने दिली गेली आहे ती जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरावे लागते. अपीलकर्ता यांना जी माहिती दिलेली आहे ती निश्चितपणे वेगळया संदर्भात वर नमुद केल्याप्रमाणे असली तरी अपीलकर्ता हे स्वतः

अनेक अर्ज देवून किंवा दिलेला अर्ज पुन्हा पाठवू नये असे कळवून पुन्हा तीच माहिती मागतात व ती दिली नाही म्हणुन पुन्हा आयोगाकडे शास्तीचा आग्रह धरीत आहे. यावरुन अपीलकर्ता यांचा हेतु स्पष्ट होतो. माहिती चुकीची दिली आहे परंतु तत्कालीन माहिती अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत. महाजनको कं. च्या कर्मचारी व अधिकारी यांना निवृत्ती वेतन नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे शास्ती लादावयाची झाल्यास त्या शास्तीची अंमलबजावणी होवू शकणार नाही किंवा शिस्तभंगाची कार्यवाही करताही येणार नाही. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की शास्ती लादावी मी पाहुन घेईन. परंतु एकुणच जी माहिती मागितलेली आहे ती स्वहिताच्या दृष्टीने मागितलेली असल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीचा गैरवापर दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि. 18.12.2008

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord3.108–112

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2335/2007.**

श्री शेख इसराईल शेख इस्माईल
मु. पो. लोणी
ता. वरुड जि. अमरावती 444 913 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अध्यक्ष
शिक्षण प्रसारक मंडळ लोणी
श्रीमती आर. सी. हायस्कुल लोणी
ता. वरुड जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.8.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. परंतू मा. अध्यक्षांनी माझ्या मागणीची पूर्तता करुन मला सहकार्य केलेले

आहे. करिता मी त्यांचा आभारी आहे. आता माझी कोणतीच तक्रार नाही उलट मा. अध्यक्षांचे मला सहकार्य लाभत आहे. सुनावणीची कार्यवाही स्थगित करुन व फाईल बंद करुन उपकृत करावे अशी अपीलकर्ता यांनी विनंती केलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

नागपूर

दि. **12.12.2008**

( विलास पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord3.113–114

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 2362/2007 व अपील क्रमांक 2363/2007.**

श्री चंद्रशेखर शांताराम बडवाईक
द्वारा वंजारी, 352 मुदलीयार हाऊस
गांधीनगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त
परिमंडळ क्र.1, नागपूर शहर
2) श्री एम. एम. वाढवे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस उपायुक्त
सिताबर्डी विभाग, नागपूर शहर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.9.2007 व 11.9.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्रमांक 2362/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी एकुण तीन अर्ज दि. 30.4.2007, 13.11.2006 व 19.4.2007 असे माहितीचे अर्ज जोडण्यात आलेले आहेत. सदरची माहिती राज्य जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस उपायुक्त सिताबर्डी यांना अर्ज दि. 13.11.2006 प्रमाणे सत्यप्रती न मिळणेबाबत. वरील कालावधी अर्जाप्रमाणे. संपुर्ण कागदपत्राची सत्यप्रती दि. 27.11.2006 ला का देण्यात आल्या नाही. हयाची जबाबदारी कोणाची आहे. जबाबदार व्यक्तीवर काय कार्यवाही झाली. अशी माहिती मागितलेली दिसून येते. त्यानंतर दि. 19.4.2007 रोजी दि. 22.5.2006 ते 26.10.2006 या कालावधीतील केस क्र. 195/06 च्या सत्यप्रती मागितलेल्या दिसून येतात. दि.13.11.06 चा अर्ज जोडलेला आहे. अपीलकर्ता यांच्या सर्व अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु दि. 13.6.2007 च्या अर्जाच्या संदर्भात माहिती उपलब्ध का झाली नाही असे विचारले आहेत. सदरचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे केलेला होता. त्या अर्जा विरुध्द कोणत्याही प्रकारचे प्रथम अपील किंवा द्वितीय अपील केलेले नव्हते व त्यामुळे त्या अर्जाच्या संदर्भामध्ये त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी सदरचा पुन्हा त्या अर्जात माहिती का देण्यात आलेली नाही असा अर्ज केलेला दिसून येतो. त्या संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक 19. 11.2006 रोजी आपल्याला पुरविण्यासाठी वरील माहिती तयार आहे आपणास ही माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क 122/- इतकी आहे. आपणास विनंती करण्यात येत आहे की हे शुल्क आपण पो.स्टे. सिताबर्डी येथे जमा करुन पावती या कार्यालयास घेवून यावी व माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी सदरचे अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेला असून त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 3.7.2007 रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना कागदपत्र उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांच्या पत्नी सौ. अपर्णा चंद्रशेखर बडवाईक यांनी पोलीसांना दि. 16.10.06

रोजी दिलेल्या जबाबात ज्या चिठठीचा उल्लेख करण्यात आलेला आहे व ती चिठठी तिने पोलीसांना दिल्याचे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे त्याबाबत माहिती अधिका–याने त्यांचे कार्यालयात सदरहु प्रकरणी उपलब्ध अभिलेख्याचे अवलोकन करुन तसेच पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन सिताबर्डी यांनासुध्दा विचारणा करुन उपरोक्त उल्लेखित चिठठी अभिलेखावर उपलब्ध असल्यास त्याची प्रत विनाविलंब व विनामुल्य अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी. अभिलेखावर उपरोक्त चिठठी उपलब्ध नसल्यास त्याबाबत अपीलकर्त्यास लेखी कळविण्यात यावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तसे अपीलकर्ता यांना आतापर्यंत कळविलेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी सदरच्या निर्णयाच्या विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या सर्व अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

1. दि. 30.4.07 च्या अर्जाची माहिती सदरचा अर्ज अप.क्र.63/07 दि. 30.4.07 रोजी माहिती मागणी करीता प्राप्त झाला. अर्जातील माहिती पो.स्टे. सिताबर्डी येथील अप.क्र. 358/06 घटनास्थळ पंचनामा करण्यास जाण्यावी वेळ, स्टेशन डायरी नोंदची सत्यप्रत सोबत कोण कर्मचारी होता त्याचे नाव, हुद्दा, बक्कल नंबर द्यावा अशा माहिती वरुन पो. स्टे. सिताबर्डीला पत्र देवुन माहिती मागितली असता पो.स्टे.कडून अप.क्र.358/06 ची माहिती पाठविण्या ऐवजी अर्जदारच दुस–या अर्जातील माहिती अप.क्र.309/06 कलम 380 भा.द.वि.च्या गुन्हयातील घटनास्थळ पंचनामा करण्याची वेळ, स्टेशन डायरी नोंदची सत्यप्रत सोबत कोण कर्मचारी होता त्याचे नाव, हुद्दा, बक्कल नंबर अशी माहिती सपोआ सिताबर्डी विभाग कार्यालयात आल्याने सदरची माहिती अर्जदार यांना नजरचुकीनी देण्यात आली. त्यामुळे अर्जदार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील मध्ये गेले होते. क्र. पोउपआ/परि.1/नाग/वाचक/8134/07 दि. 13.6.2007 अन्वये अर्जदार यांना अप.क्र.358/06 कलम 342,448,427 भा.द.वि.या गुन्हयातील घटनास्थळ

4

पंचनामा करणे कामी पोउपआ मंडवधरे आणि पो.शि. चंदन बं.नं.4881 पो.स्टे. सिताबर्डी हे गेले होते त्यांची रवानगी व वापसीची स्टेशन डायरी मधील नोंदची प्रमाणीत सत्यप्रत या सोबत जोडुन अपीलकर्त्यास पुरविण्यात आलेली आहे व सदर अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

2. दि. 19.4.07 ची माहिती– श्री चंद्रशेखर शांताराम बडवाईक यांनी दि. 19.4.07 रोजी दिलेल्या अर्जातील माहिती केस क्र. 195/06 च्या सत्यप्रती (हयापुर्वीचा संदर्भ क्र. सपोआ/मा.अधि/3840/06 दि.19.11.06) क्र. 1) प्राथमिक आदेश 2) समन्स 3) रोजनामा 4) सुचनापत्र– प्रति, भा.शा.बडवाईक आणि रुपेक्षा भा.बडवाईक हयांचे तर्फे आमरण उपोषण आणि आत्महेत्येच्या धमक्या मिळणेबाबत पोउपनि आर.पी.बर्गे सिताबर्डी यांचे सुचनापत्र 5) गैरअर्जदारांनी आणि सुनंदा भा.बडवाईक हिने दिलेले अर्जाच्या संपुर्ण प्रती पृष्ठ क्र. 1 ते 6, पृष्ठ क्र. 24 ते 31, पृष्ठ क्र. 9 अशी माहिती अर्जात नमुद असुन सदरची केस सहा.पो.आयुक्त सिताबर्डी विभाग कार्यालय नागपुर येथि असल्याने अर्जदार यांना फोनद्वारे कळवुन त्यांना कार्यालयात बोलावुन जा.क्र.सपोआ/सिवि/मा. अधि/1041/07 दि. 21.4.07 अन्वये पो.स्टे.सिताबर्डी येथे 34 रुपचे भरुन माहिती घेवुन जाणे संबंधी पत्र देण्यात आले व नंतर पैसे भरल्या नंतर माहिती देण्यात आली.

3. दि. 13.11.2006 चे अर्जातील माहिती केस नं. 195/06, दिनांक 13.11.2006 च्या अर्जाप्रमाणे संपुर्ण सत्यप्रती मिळणे बाबत दिनांक 13.11.2006 च्या अर्जात मागितलेली माहिती 1) केस नं. 194/06 कलम जा.फौ.दि. 4.7.06 आणि श्री भालचंद्र शा.बळवाईक व रुपेक्षा भालचंद्र बळवाईक केस नं. 195/06 शी संबंधीत संपुर्ण लिखीत कागदपत्राची सत्यप्रत दि. 4.7.06 ते माहिती तयार होणेचे दिनाकपर्यंत सदर अर्जाची माहिती देण्यात येते अशी माहिती अर्जदार यांना कळवुन सहा.पा.आयुक्त सिताबर्डी विभाग कार्यालय नागपुर येथि बोलावुन त्यांना 122 रुपये पो.स्टे.सिताबर्डी येथे पैसे भरण्याचे पत्र जा.क्र.

सपोआ/सिवि/मा.अधि/3840/06 दि. 19.11.06 अन्वये पत्र देवुन दुयम प्रतीवर त्यांनी सही केलेली आहे आणि नंतर पैसे भरुन माहिती देण्यात आलेली आहे.

अर्जदार यांनी 2006 ते 2007 या कालावधीमध्ये एकुण तेरा अर्ज माहिती मिळण्या करीता केलेले आहेत त्यापैकी सहा अर्जामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी मा. पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. 1 नागपुर यांचेकडे अपील मध्ये गेलेले आहेत व सहाही अपील अर्ज निकाली निघालेले आहेत तसेच सतत अर्जामध्ये द्वितीय अपील मा. राज्य माहिती आयोग विदर्भ क्षेत्र नागपुर कार्यालय येथे अपील केलेले आहेत. त्यापैकी तीन अर्ज निकाली निघालेले आहेत व चार अर्जाची सुनावणी बाकी आहेत.

एकंदरीत अर्जदार यास पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना हेतुपुरस्सर त्रास देण्याचा मुळ उद्येश असतो करीता अर्जचार यांचा अपील क्र. 2363 चा अर्ज निकाली काढण्यास्तव विनंती सादर आहे.

त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा खुलासा दाखल केलेला आहे तो खालीलप्रमाणे.

श्री चंद्रशेखर शांताराम बडवाईक द्वारा वंजारी, 352 मुदलीयार हाऊस केशव निवास गांधीनगर नागपूर जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस उपायुक्त सिताबर्डी विभाग, नागपूर शहर यांचेकडे दि. 30.4.2007, 13.11.2006 व 19.4.2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये दिलेल्या अर्जाप्रमाणे संपूर्ण कागदपत्राच्या प्रती देण्यात आलेल्या नाही, तसेच दि.30.4.2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत मागितलेल्या माहितीचे उत्तर जा.क्र. 1242 दि. 22.5.07 रोजी देण्यात आले ते चुकीचे आहे इत्यादी कारणे नमुद करुन अपीलकर्त्यास पुरविण्यात आलेले कागदपत्र पृष्ठ क्र. 15 दि. 16.6.2006 सौ. अपर्णा चंद्रशेखर बडवाईकच्या जबाबात उल्लेख करण्यात आलेली चिठठीची प्रतची मागणी केलेली होती व दि.30.4.06 रोजी

माहिती अधिकार सिताबर्डी विभाग यांनी दिलेले उत्तर योग्य नाही. सबब चुकीची माहिती दिल्याबाबत निर्णय कळविण्याची मागणी केलेली होती.

उपरोक्त अपील अर्जाचे संबंधाने अपीलकर्त्यास दि. 20.6.2007 रोजी कार्यालयात बोलावून समक्ष देवून त्यांचे अपील अर्जासंबंधात व त्यांच्या मागणी संबंधात त्यांचे म्हणणे ऐकून घेतले तसेच स.पो.आ. सिताबर्डी विभाग यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन करण्यात आले.

माहिती अधिकारी सिताबर्डी विभाग यांनी त्यांचे 16.6.2007 चे पत्रान्वये कळविले की अपीलकर्ता श्री चंद्रशेखर बडवाईक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये वेळोवेळी मागितलेली माहिती त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये वेळोवेळी प्रत्यक्ष व पो.स्टे.सिताबर्डीचे मार्फतीने पुरविण्यात आलेली आहे. अपीलकर्त्याने दि. 30.4.2007, 13.11.2006 व 19.4.2007 च्या संबंधाने मागितलेली माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यात आलेली आहे. याव्यतिरिक्त अपीलकर्त्याने त्यावेळेस केस क्र. 194, 195/06 कलम 107,116(3) जा.फौ.चे संपूर्ण कागदपत्राची स्वतः अवलोकन करण्याची मागणी केली असता त्यांना संपुर्ण फाईलचे अवलोकन करण्याची संधी सुध्दा देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता हे वारंवार माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अनेक कागदपत्र व माहिती मागणी करतात व माहितीच्या सत्यतेबाबत शंका सुध्दा उपस्थित करतात. वास्तविकपणे अर्जदार व त्यांचा लहान भाऊ यांच्यात वडीलोपार्जीत घरा संबंधाने दोन भावात कौटुबिक वाद असून सदर करणात अपीलकर्ता यांनी पो.स्टे.सिताबर्डी येथे त्यांचे भावा विरुध्द दिलेल्या तक्रारी संबंधाने वेळोवेळी दखल घेवून रितसर कार्यवाही सुध्दा केल्याचे दिसून येते. या संबंधात दाखल गुन्हे न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहेत. अपीलकर्त्याचा वाद कौटुबिक कारणावरुन दिवाणी स्वरुपाचा वडीलोपार्जीत संपत्ती संबंधाने असल्याने त्यांना न्यायालयातून दाद मागण्यास मोकळीक आहे.

एकंदरीत अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत माहिती अधिका–यास वेळोवेळी अर्ज करुन त्यांचे प्रकरणासंबंधातील माहिती मागितलेली आहे. त्यांनी मागितलेली माहिती माहिती अधिका–याने वेळोवेळी पुरविलेली आहे. पुरविण्यात आलेल्या लेखी माहितीच्या प्रतींची संख्या सुध्दा प्रचंड आहे. माहिती अधिका–याने माहिती पुरवुन सुध्दा अपीलकर्त्याचे समाधान होत नसल्याने त्याने प्रथम अपीलीय अधिकारी परिमंडळ क्र.1 यांचेकडे वेळोवेळी अनेक अपीले केलेली असून त्यावर निष्पक्षपातीपणे विचार करुन माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीस अधिन राहुन योग्य निर्णय घेवून काही अपीलामध्ये अपीलकर्त्याची विनंती मान्या करुन त्यास माहिती पुरविण्यात आलेली आहे. हे तथ्य असतांना सुध्दा अपीलकर्ता हा वारंवार उपरोक्त अधिनियमा अंतर्गत वारंवार माहितीची मागणी करतो व माहिती अधिका–याकडून ती पुरविण्यात आल्यानंतर प्राप्त माहितीवरुन पुन्हा माहितीची मागणी करतो तसेच पुरविलेल्या माहितीने समाधान न होवून पुन्हा पुन्हा प्रथम माहिती अधिका–याकडे अपील करतो. यावरुन अपीलकर्त्यास या अधिनियमा अंतर्गत प्राप्त अधिकारा अन्वये त्यास कितीही माहिती पुरविली तरी त्याचे समाधान होणार की नाही यात शंका आहे.

अपील अर्जात अपीलकर्त्याने जी कारणे नमूद केलेली होती व जी माहिती मागितलेली होती त्याबाबत तथ्याचे अवलोकन करुन त्यास त्याने मागणी केल्याप्रमाणे माहिती अधिका–याने योग्य व पुरेशी माहिती पुरविल्याचे आढळून आले. तथापी समक्ष भेटीत अपीलकर्त्याने तीची पत्नी सौ. अर्पणा चंद्रशेखर बडवाईक हिने पोलीसांना दि. 16. 6.2006 रोजी दिलेल्या जबाबत ज्या चिठठीचा उल्लेख करण्यात आलेला आहे व ती चिटठी तिने पालीसांना दिल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे त्याबाबत माहिती अधिका–याने त्यांचे कार्यालयात सदरहू प्रकरणी उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन करुन

तसेच व पो.नि. पो.स्ट.सिताबर्डी यांना सुध्दा विचारणा करुन उपरोक्त उल्लेखित चिठठी अभिलेखावर उपलब्ध असल्यास त्याची प्रत विनाविलंब व विनामुल्य अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी. अभिलेखावर उपरोक्त चिठठी उपलब्ध नसल्यास त्याबाबत अपीलकर्त्यास लेखी कळविण्यात यावे अशी समज देण्यात आलेली आहे.

अपीलकर्त्याने अपील अर्जात माहितीच्या तपशिल अंतर्गत मुद्या क्र. 2 मध्ये नमुद प्रमाणे दि. 30.4.07 मा.अ.अधिनियम 2005 अंतर्गत केलेल्या मागणी अर्जाचे योग्य उत्तर मिळाले नाही असे नमूद केले आहे. त्याबाबत अपीलकर्त्याने दि. 23.5.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेल्या अर्जाबाबत अपीलकर्त्यास या कार्यालयाचे दि. 13.6.2007 चे पत्रान्वये यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे. सबब मुद्याबद्यल यापूर्वीच निर्णय घेण्यात आलेला असून त्याची पूर्तता झालेली असल्याने अपीलकर्त्याने अपील अर्जात नमूद केलेला हा मुद्या संयुक्तीक व गैरवाजवी असल्याचे आढळून आले.

अपीलकर्त्याचे अपील अर्जात वर नमुद प्रमाणे निर्णय घेण्यात येवून अपील अर्ज दि. 3.7.2007 रोजी निकाली काढण्यात आले आहे. सदर अपील निर्णयाची प्रत अपीलकर्त्याने समक्ष कार्यालयात येवून दि. 6.7.07 रोजी प्राप्त केलेली आहे. अपीलावरील निर्णय आदेशामध्ये द्वितीय अपील 30 दिवाचे आंत करावे असे अनवधानाने लिहीले गेलेले होते.

एकंदरीत अर्जदाराने यापुर्वी अनेक वेळा उपरोक्त अधिनियमा अंतर्गत मागितलेली माहिती त्यास वेळोवेळी विहित मुदतीत पुरविण्यात आलेली असून त्यानी वेळोवेळी केलेल्या अपीलावर संयुक्तीक व योग्य निर्णय देण्यात आलेला आहे. तसेच अनेक वेळा मा. महोदयांकडे केलेल्या द्वितीय अपीलांचा सुध्दा निकाल लागून ती सर्व द्वितीय अपीले खारीज करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे अपीलकर्त्याचे उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यास विनंती आहे.

अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाच्या संदर्भात असे नमुद आहे की प्रथम अपीलाची सुनावणी न घेता निर्णय दिलेला आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांचे खुलाशामध्ये अपीलकर्ता यांना नस्तीचे निरीक्षण देण्यात आले होते असे नमुद केलेले आहे व त्याबाबत अपीलकर्ता यांनीसुध्दा संपुर्ण फाईलचे अवलोकन केलेले आहे असे सांगितले. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे ''माहिती'' या संज्ञेची व्याख्या केलेली आहे. ''माहिती'' या याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई–मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल) कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्रीचा समावेश होतो. व ''माहितीचा अधिकार'' याचा अर्थ, (एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे,

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे,

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे, असा आहे. व त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात जशी आहे तशी उपलब्ध करुन घेणे असा त्याचा अर्थ होतो. प्रकरणातील गुणवत्तेच्या निरीक्षणाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची माहिती अपेक्षित नसते व त्यामुळे अपीलकर्ता यांना केस क्र. 194,195/06 च्या संदर्भामध्ये पोलीस स्टेशनमध्ये जी नस्ती उपलब्ध असेल त्या नस्तीमध्ये जी जी कागदपत्रे उपलब्ध असतील ती माहिती उपलब्ध होवू शकेल. जी माहिती अपीलकर्ता यांना अपेक्षित आहे ती उपलब्ध नसेल तर त्याबाबत योग्य त्या सक्षम अधिका–याकडे किंवा न्यायालयाकडे अपीलकर्ता यांना गुणवत्तेच्या संदर्भामध्ये त्यांची तक्रार मांडता येईल व त्यामुळे संपुर्ण अर्जाच्या संदर्भामध्ये व अभिलेख्याचे अवलोकन केलेले असल्यामुळे तसेच अपीलकर्ता यांनी एकाच केसच्या संदर्भामध्ये अनेक अर्ज केलेले असल्यामुळे जरी माहिती त्यांना उपलब्ध असली तरी ती त्यांच्या अपेक्षेप्रमाणे

नसल्यामुळे ती खोटी व दिशाभुल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली असे त्यांचे म्हणणे आहे. वर नमुद केलेल्या प्रमाणे बयानात ज्या चिठठीचा उल्लेख आहे त्या चिठठीच्या संदर्भातसुध्दा अपीलकर्ता यांना नस्तीचे अवलोकन केले असते तर वस्तुस्थिती आढळून आलेली असेल व ती चिठठी जरी नस्तीमध्ये उपलब्ध नसेल तरी त्याबाबत माहितीच्या अधिकारात आग्रह धरणे हे योग्य नाही. कारण बयाण हे त्यांच्या पत्नीचे बयाण आहे. व त्यामुळे मात्र सदरची चिठठी उपलब्ध नसल्यास लेखी कळविण्यात यावे असा जो निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना लेखी कळविण्यात यावे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे किंवा खोटी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

3. अपील कमांक 2363/2007 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.4.2007 च्या अर्जातच जोडण्यात आलेली आहे व त्यामुळे वरील अपीलामध्ये दि. 30.4.2007 च्या अर्जाचा सुध्दा विचार करण्यात आलेला दिसून येतो. दि. 30.4.2007 च्या अर्जामध्ये वरील घटनास्थळ पंचनामा करण्यास जाण्यावी वेळ, स्टेशन डायरी नोंदची सत्यप्रत सोबत कोण कर्मचारी होता त्याचे नाव, हुद्या अशी त्यांनी मागितलेली आहे. त्या संदर्भात सुध्दा दि. 5.5.07 व 9.5.2007 रोजी माहिती दिली कि अर्जदार यांना घटनास्थळ पंचनाम्याची प्रत पुरविण्यात आलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 23.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.6.2007 रोजी देण्यात आलेला असून जी अपुर्ण व अर्धवट माहिती दिलेली होती त्यानंतर त्यांना माहिती पुरविण्यात येत आहे असे निर्णयात म्हटलेले आहे. त्यामुळे घटनास्थळ पंचनाम्याची प्रतची माहिती व वापसीची स्टेशन डायरी नोंदीची सत्यप्रत पुरविण्यात आलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु दिलेल्या प्रती हया सत्यप्रती नसुन सत्यप्रतीची झेरॉक्स आहे त्या सत्यप्रती

त्वरीत देण्यात याव्यात अशा प्रकारे कारण देवून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या छायांकित प्रती हया अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणुन दिले आहे त्यावर प्रमाणित केलेले नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की न्यायालयामध्ये त्या ग्राहय धरल्या जात नाही व त्यामुळे त्या प्रमाणित करुन मिळाव्या अशी त्यांची मागणी आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती टाळाटाळ केलेली नाही पण प्रमाणित करुन दिल्या नाहीत त्यामुळे त्या प्रमाणित करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपील क्रमांक 2362/2007 हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपील क्रमांक 2363/2007 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 30.4.2007 च्या अर्जाप्रमाणे कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्यावर माहितीच्या अधिकारात उपलब्ध करुन दिल्या आहेत व कार्यालयाचे सिल व तारीख टाकून प्रमाणित करुन देण्यात यावे त्याकरीता अपीलकर्ता यांनी मिळालेल्या माहितीची छायांकित प्रती ही जन माहीती अधिकारी यांचे कार्यालयात सादर करुन वरील प्रमाणे प्रमाणीत करुन देण्यात यावे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
दि.**17.12.2008**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
विदर्भ क्षेत्र, नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2474/2007.**

श्री छबन पुंडलिकराव अंजनकर
क्वार्टर नं. डी 38/1, कर्मचारी वसाहत
रविनगर, नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर
जूने सचिवालय इमारत, सिव्हील लाईन नागपूर 1.
2) श्री सुखदेवे
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क. 1
रेसिडेन्सी रोड, सदर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.10.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील करण्याचे कारण पहिल्या अपीलाप्रमाणे माहिती देण्याचे आदेश देवून सुध्दा वेळेच्या आंत माहिती प्राप्त झाली नाही अशी तक्रार केली आहे. दि. 30.3.2007 चे अर्जात नमुद केलेली माहिती अद्याप अप्राप्त आजे. तसेच दि. 18.6.2007 चे पत्रानुसार 10 दिवसात पुरवावयाची माहिती अनुनही प्राप्त झाली नाही म्हणून दि. 10.10.2007 ला सदरचे अपील दाखल केलेले दिसते. उत्तरवादी क्र. 1 तर्फे कार्यकारी अभियंता श्री सुखदेवे व क्र. 2 तर्फे अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ यांच्या तर्फे अधिक्षक श्रीमती विद्या घुक्षे हे हजर आहेत.

3. अर्जदाराच्या तक्रारीनुसार अर्जदारानी आता असे मान्य केले की आवश्यक असलेली सर्व माहिती उत्तरवादी तर्फे मिळालेली आहे व आता कुठलीही माहिती मिळण्याची गरज नाही म्हणन त्यांना सदरचे अपील चालवावयाचे नाही हया संबंधी लेखी अर्ज त्यांनी प्रकरणात दाखल केलेले आहे व तो मान्य करण्यास काहीही हरकत नाही म्हणून अपीलात गुणदोषाच्या निर्णयाची आवश्यकता वाटत नाही.

4. उत्तरवादी क्र. 1 व 2 हयांनी बोनाफाईड दाखवून त्यांचे निवासस्थानाबद्यल जी काही तक्रार होती त्याचे विवरण त्यांनी उत्तरवादीना लिहुन दिले व उत्तरवादीनी 15 दिवसात त्याचे निरसन करण्याचे आश्वासन दिले. वरील बाबीची तडजोड विचारात घेता अपीलाच्या गुणवत्तेनुसार निर्णय देण्याची गरज भासत नाही व अर्जदाराना लेखी तक्रारीनुसार अपील मागे घेण्याची परवानगी मागितली आहे. ती त्यांना देण्यात आली. वरील सर्व बाबींचा विचार करुन अपील निकालात काढले आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

दि. **31.12.2008**

( भाष्कर पाटील )

राज्य माहिती आयुक्त,

विदर्भ क्षेत्र, नागपूर.

Ageyord3.126–128

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2479/2007.**

श्री राजू हिन्दुस्तानी
आकार बिल्डर्स, बिल्डींग 21,
फ्लॅट 17, बैरामजी टाऊन,
चिटणीस नगर लेआऊट नागपूर 13. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एच. गुज्जेलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास सदर नागपूर
2) श्री आर. अनंतकुमार
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (गुणनियंत्रण)
नागपूर सुधार प्रन्यास सदर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.12.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.10.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांना नोटिस देवुन सुध्दा गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय

अधिकारी यांनी अर्जदाराने दाखल केलेले पत्राची प्रत रेकॉर्डवर दाखल केलेली आहे. परंतु मी मागितलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची होती व ती नासुप्र कडे एकत्रित संकलीत स्वरुपात उपलब्ध नव्हती तरी सुध्दा मला आवश्यक तेवढी माहिती प्राप्त झालेली असल्यामुळे सदरहू अपील मी मागे घेत आहे. वास्तविक पाहता अपिलकर्त्यानी हे पत्र देवुन स्वतः हजर राहण्याची आवश्यकता होती परंतु अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मी स्वतः हजर असतांना त्यांनी कार्यालयात पत्र आणून दिले व त्याला कार्यालयातर्फे आवक नोंदवहीमध्ये नोंद करुन त्याची प्रत दाखल करीत आहे. माहिती अधिकारी हे कार्यकारी अभियंता असल्यामुळे त्यांनी दिलेले स्टेटमेंट खरे समजुन व अपीलकर्ता गैरहजर आहे यावरुन असा निष्कर्ष काढण्यात येत आहे की अपीलकर्त्याला अपील चालविण्यामध्ये कोणतेही स्वारस्य दिसत नाही व त्याला माहिती मिळालेली आहे. करीता अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
दि. **31.12.2008**

( भाष्कर पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
विदर्भ क्षेत्र, नागपूर.